१०३ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
नवाकाळ
• पुणे, मंगळवार २६ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३३९, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 339, Marathi - Daily - Pune, 26 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## सरकारी कर्मचाऱ्यांना आज वेतन मिळणार



**कोल्हापूर -** राज्यातील सर्व शासकीय कर्मचारी व पेन्शनधारकांचे वेतन उद्याच जमा होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. वित्त विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. नागरिकांना आर्थिक ताण न घेता सण साजरा करता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार आज कोल्हापूर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी शहरातील विकासकामांचा आढावा घेतला. ते म्हणाले की, करवीर निवासिनी अंबाबाई मंदिर पुनर्विकास प्रकल्पासाठी राज्य मंत्रिमंडळाने तब्बल १,४४५ कोटींचा निधी मंजूर केला आहे. सध्या १४३ कोटी रुपयांची कामे सुरू असून, त्यात संवर्धन, मार्केट डेव्हलपमेंट, लँडस्केपिंग आणि मंदिर सुविधांचा समावेश आहे. वैज्ञानिक व सांस्कृतिक पुनर्बांधणीसाठी पुरातत्व खात्याशी सल्लामसलत सुरू आहे.

## धनखडांचा राजीनामा तब्येतीमुळेच अमित शहांकडून कामाचे कौतुक

**पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिल्याने देशभर खळबळ उडाली. राजीनामा दिल्यापासून धनखडांचा चेहराच दिसला नाही. त्यावरून विरोधी पक्षांकडून मोदी सरकारला जाब विचारला जात असतानाच आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. धनखड यांनी तब्येतीच्या कारणावरून राजीनामा दिला आहे, असा दावा शहा यांनी केला. धनखड यांच्या कामाचेही कौतुक केले. धनखड यांनीही राजीनाम्यासाठी तब्येतीचे कारण दिले होते.**



■ नवी दिल्ली

**एका** मुलाखतीमध्ये गृहमंत्री शहा म्हणाले, धनखड हे घटनात्मक पदावर होते. आपल्या कार्यकाळात संविधानाला अनुसरून त्यांनी चांगले काम केले. तब्येतीच्या कारणावरून त्यांनी राजीनामा दिला. आता या सगळ्यांना अधिक ताणण्याची, भलत्यासलत्या दिशेने बघण्याची गरज नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, धनखड यांनी २१ जुलैला संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राजीनामा दिल्यानंतर अमित शहा यांची ही पहिलीच प्रतिक्रिया आहे.

संसदेत मांडलेल्या १३० व्या घटनादुरुस्ती विधेयकावरून » पान २ वर

# पंतप्रधानांचे शिक्षण किती? कळणारच नाही

## माहिती आयोगाचा आदेश न्यायालयाने फेटाळला

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पदवीची माहिती सार्वजनिक करण्याच्या केंद्रीय माहिती आयोगाच्या आदेशाला दिल्ली उच्च न्यायालयाने आज रद्दबातल ठरवले. ही माहिती जाहीर करण्यास दिल्ली विद्यापीठाने नकार दिला होता. त्यानंतर केंद्रीय माहिती आयोगाने पदवी सार्वजनिक करण्याचा आदेश दिला होता. मात्र आता न्यायालयाने तो रद्द केल्याने पंतप्रधान मोदी यांचे शिक्षण नेमके किती झाले आहे, त्यांनी कोणत्या विद्यापीठातून कुठल्या विषयाची पदवी घेतली आहे ही माहिती कधीच बाहेर येणार नाही. ती गोपनीयच राहणार आहे. माजी केंद्रीय शिक्षणमंत्री स्मृती इराणी यांच्या शिक्षणाबाबतही गूढ याच निर्णयाने कायम राहणार आहे.**




**पंतप्रधान** मोदी यांनी त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात आपण १९७८ मध्ये दिल्ली विद्यापीठातून बॅचलर ऑफ आर्ट्स (बीए) ची राज्यशास्त्र विषयाची पदवी प्राप्त केली आहे, असे नमूद केले होते. मोदींच्या विरोधकांनी त्यांच्या पदवीबाबत संशय व्यक्त करून ती सार्वजनिक करण्याची अनेकदा मागणी केली आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सर्वप्रथम मोदी यांच्या शैक्षणिक पदव्यांची माहिती सार्वजनिक करा, अशी मागणी केल्यावर हा मुद्दा चर्चेत आला होता. याच सुमारास नीरज शर्मा या माहिती अधिकार कार्यकर्त्याने, १९७८ मध्ये दिल्ली विद्यापीठाने दिलेल्या सर्व बीए पदव्यांची माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. याच वर्षी आपण बीए उत्तीर्ण झाल्याचा दावा मोदी यांनी केला आहे. त्यावेळी विद्यापीठाने एखाद्याच्या खासगी पदवीशी संबंधित माहिती उघड करण्यास नकार देत म्हटले होते की, ही माहिती खासगी असून, तिचा सार्वजनिक हिताशी काहीही संबंध नाही. त्यानंतर डिसेंबर २०१६ मध्ये, शर्मा यांनी विद्यापीठाच्या निर्णयाविरुद्ध केंद्रीय माहिती आयोगाकडे धाव घेतली होती. माहिती आयुक्त प्रा. एम. आचार्यूलु यांनी दिल्ली विद्यापीठाला १९७८ मध्ये कला शाखेत पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची यादी असलेले रजिस्टर सार्वजनिक करण्याचा आदेश पारित केला होता. मात्र, दिल्ली विद्यापीठाने २३ जानेवारी २०१७ रोजी केंद्रीय माहिती अधिकाराच्या आदेशाला आव्हान देत उच्च न्यायालयात धाव घेतली.

या प्रकरणाच्या सुनावणीवेळी दिल्ली विद्यापीठाने युक्तिवाद केला की, आम्ही पंतप्रधान मोदींच्या पदवीची माहिती न्यायालयासमोर सादर करण्यास तयार आहे. मात्र माहिती अधिकार कायद्याअंतर्गत अनोळखी व्यक्तीला ती माहिती देऊ शकत नाही. आम्ही नैतिक बंधनानुसार विद्यार्थ्यांच्या माहितीचे संरक्षण करत आहोत. केवळ कुतूहल म्हणून माहिती अधिकार कायद्याअंतर्गत वैयक्तिक माहिती मागितली जात आहे, त्याचे आम्ही समर्थन करत नाही.

या प्रकरणाच्या सुनावणीला दिल्ली विद्यापीठाच्या वतीने उपस्थित असलेले महाधिवक्ता तुषार मेहता यांनी म्हटले की, माहिती अधिकाराचा आदेश रद्द करावा. कारण गोपनीयतेचा अधिकार » पान २ वर

### स्मृती इराणींची माहितीही गोपनीय



नीरज शर्मा यांनी पंतप्रधान मोदी यांच्याव्यतिरिक्त भाजपाच्या माजी केंद्रीय शिक्षणमंत्री स्मृती इराणी यांची शैक्षणिक माहितीही सार्वजनिक करण्याची मागणी न्यायालयाकडे केली होती. केंद्रीय माहिती आयोगाने सीबीएसई बोर्डाला इराणी यांनी १९९१ आणि १९९३ मध्ये दहावी आणि बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली होती की नाही, हे उघड करण्याचे आदेश देण्यात आले होते. न्यायालयाने ही मागणीदेखील अमान्य करत म्हटले की, ही माहिती उघड करण्यात कुठलेही सार्वजनिक हित नाही. कोणत्याही व्यक्तीचे गुणपत्रक, निकाल, पदवी प्रमाणपत्रे, शैक्षणिक नोंदी या ती व्यक्ती सार्वजनिक पदावर असली तरीही, वैयक्तिक माहितीच्या स्वरूपाची असतात. ही माहिती अधिकार कायद्यांतर्गत वगळण्यात आली आहे. त्यामुळे ती देता येणार नाही.

## दोन दिवसांत मराठा आरक्षण द्या! मुंबईला येणार नाही! जरांगेंची भूमिका

■ जालना

**आम्हाला** आरक्षण दिल्यास आम्ही मुंबईला येणार नाही, अशी भूमिका मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटीत आज मांडली. मनोज जरांगे २७ ऑगस्टला सकाळी १० वाजता मराठा आंदोलकांसह मुंबईकडे कूच करणार आहेत. ते २९ ऑगस्ट रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर आमरण उपोषणाला सुरुवात करणार आहेत. याच पार्श्वभूमीवर आज त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला दोन दिवसांची मुदत दिली.



ते म्हणाले की, दोन दिवसांत आरक्षण द्या, त्यानंतर एकदा मुंबईला निघालो की, मागे फिरणार नाही.

ते पुढे म्हणाले की, फडणवीस यांना ही प्रेमाची विनंती आहे. आम्हाला संविधानात बसणारे आरक्षण हवे आहे. फडणवीसांना ही संधी आहे. ओबीसी तुमचे आहेत, आरक्षण दिल्यास मराठेही तुमचे होतील. एकदा अंतरवाली सराटी सोडले की, आम्ही कुणाचेही ऐकणार नाही. मंत्री येऊ द्या, नाहीतर कुणीही येऊ द्या. मी कुणाचेही ऐकणार नाही. मी सरकारही पाडू शकतो. आमची ही मागणी आजची नाही. पत्रकारांसमोर चार महिन्यांपूर्वी आम्ही तारीख जाहीर केली होती. मग आडमुठेपणा » पान २ वर

## बीसीसीआय-ड्रीम ११ फारकत ३५८ कोटींचा करार मोडला

■ मुंबई

**केंद्र** सरकारने ऑनलाईन गेमिंगवर कायद्याद्वारे निर्बंध लादल्याचा पहिला फटका




भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळ म्हणजेच बीसीसीआयला बसला. भारतीय क्रिकेट संघाचे प्रायोजकत्व असलेल्या ड्रीम ११ या ऑनलाईन गेमिंग ॲपने बीसीसीआयसोबतच तब्बल ३५८ कोटी रुपयांचा करार अर्ध्यातच मोडला. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी आज ही माहिती दिली.

ऑनलाईन गेमिंग कायद्यानुसार, ड्रीम ११ सारख्या रिअल मनी ऑनलाईन गेमिंग प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्यात आली आहे. बीसीसीआयच्या मते, ऑनलाईन गेमिंगचे नियमन करणारा कायदा आल्याने ड्रीम ११ आणि बीसीसीआय यांचा एकमेकांशी संबंध राहणार नाही. भविष्यातही बीसीसीआयकडून अशा कोणत्याही कंपनीशी संबंध जोडले जाणार » पान २ वर

## अमित साटम मुंबई भाजपाचे अध्यक्ष

■ मुंबई

**भाजपा** प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित साटम यांची मुंबई भाजपा अध्यक्षपदी नियुक्ती केली. राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांचा मुंबई भाजपाअध्यक्ष म्हणून कार्यकाळ संपला. त्यामुळे पक्षाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आ. साटम यांच्यावर ही जबाबदारी सोपवली.

२०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली होती. परंतु त्यावेळी निवडणुकीत भाजपाला धक्का बसला होता. त्यानंतर २०२२ मध्ये पुन्हा ही जबाबदारी शेलार यांच्याकडे दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शेलारांचा भाजपा मुंबई अध्यक्षपदाचा कार्यकाळ संपला.



अमित साटम २०१४ पासून अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. ते सलग तीन वेळा निवडून आले आहेत. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १९७६ रोजी मुंबईत झाला. त्यांनी १९९८ मध्ये मिठीबाई कॉलेजमधून राज्यशास्त्र व समाजशास्त्र विषयात कला शाखेची पदवी घेतली. त्यानंतर २००० मध्ये मुंबई विद्यापीठाच्या महात्मा गांधी मिशन्स इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च येथून एमएमएस ही पदवी प्राप्त केली आहे.

## श्वानांची हत्या करणाऱ्याचे गावामध्ये उत्साहात स्वागत

■ जयपूर

राजस्थानातील झुनझुनु येथे रस्त्यावर त्रास देणाऱ्या तब्बल २५ श्वानांची हत्या करणाऱ्या आरोपीची जामिनावर सुटका झाल्यानंतर त्याच्या गावात त्याचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. त्याच्या स्वागतासाठी गावात डीजे लावण्यात आला. त्याला फुलांच्या माळा घालण्यात आल्या. त्याची गावातून मिरवणूकही काढण्यात आली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

राजस्थानच्या झुनझुनु तालुक्यातील कुमावास या गावाचे श्योचंद बावारीया याने २ ऑगस्ट रोजी गावातील २५ कुत्रे मारले होते. त्यावर जवळच्या एका गावातील माजी सरपंच सरोज झांजीझाडीया याने तक्रार दाखल केली होती. त्यानंतर बावरीला अटक केली होती. त्याची काल जामिनावर सुटका झाल्यानंतर त्याचे त्याच्या गावात जोरदार स्वागत करण्यात आले. या व्हिडिओवर काही प्राणीप्रेमींनी तीव्र आक्षेप व्यक्त केला आहे. अशा पद्धतीने गुन्हेगारांचे उदात्तीकरण चुकीचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एका नेटकऱ्याने म्हटले आहे की, अशा प्रकारे गुन्हेगाराचे स्वागत करणे व त्याला मान देणे हे समाजासाठी धोकादायक आहे.

## भाजपामध्ये जाणार कळताच वैभव खेडेकरांना मनसेतून काढले

### खेड-दापोलीत रामदास कदमांच्या वर्चस्वाला आव्हान?

■ मुंबई

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेनेच्या स्थापनेपासून राज ठाकरे यांची साथ देणारे वैभव खेडेकर यांची आज पक्षातून तडकाफडकी हकालपट्टी करण्यात आली. रत्नागिरीच्या खेड-दापोलीचे मातब्बर नेते असलेले खेडेकर हे भाजपामध्ये जाण्याची चर्चा असतानाच त्यांची पक्षातून हकालपट्टी करून मनसेने त्यांची ताकद कमी केल्याचे म्हटले जात आहे. मनसेचा राजीनामा देण्याआधीच ही हकालपट्टी करण्यात आली आहे. खेडेकरांना पक्षात घेऊन एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे मातब्बर नेते रामदास कदम यांच्या वर्चस्वाला भाजपाकडून आव्हान दिले जात आहे.



नाशिकमध्ये सुधाकर बडगुजर हे भाजपामध्ये जाण्याच्या तयारीत असल्याची कुणकुण लागताच ठाकरेंच्या शिवसेनेने त्यांची हकालपट्टी केली होती. त्यानंतर बडगुजर यांचा भाजपाप्रवेश अनेक दिवस खोळंबला. भाजपाच्या राज्य नेतृत्वाचीही मोठी नाचक्की झाल्याचे बघायला मिळाले होते. बडगुजर यांचा नंतर अचानक एका दिवशी भाजपाप्रवेश झाला. दरम्यान, खेडेकर यांनी भाजपाप्रवेशाची चर्चा फेटाळून लावली. पण त्यांचे समर्थक, निकटवर्ती हे भाजपाप्रवेश निश्चित असल्याचे सांगत आहेत. खेडेकर हे काही दिवसांपूर्वी दापोली येथे झालेल्या एका कार्यक्रमात महायुतीच्या नेत्यांसोबत दिसले होते.

मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशानुसार, खेडेकर यांच्यासोबतच » पान २ वर

## कमाईसाठी थट्टामस्करी नको इन्फ्लूएन्सर्सना कोर्टाचे फटकारे

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने आज सोशल मीडिया आणि युट्यूब इन्फ्लूएन्सर्सची कठोर शब्दांत कानउघाडणी केली. न्यायालयाने स्पष्ट केले की, कमाईच्या उद्देशाने केलेली थट्टामस्करी सहन केली जाणार नाही. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म कमाईसाठी वापरणाऱ्यांचा मजकूर (कंटेंट) हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या चौकटीत बसत नाही. ही व्यावसायिक अभिव्यक्ती आहे. स्टँडअप कॉमेडियन समय रैनासह इतरांना बिनशर्त माफी मागण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले. तसेच माहिती आणि प्रसारण खात्याला सोशल मीडियासाठी दिशादर्शक सूचना तयार करण्यास सांगितले.

समय रैनाच्या शोमध्ये यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाच्या टिप्पणीने वाद निर्माण झाला होता. स्टँडअप कॉमेडियन समय रैना, विपूल गोयल, बलराज परमारजीत सिंह घई, निशांत जगदीश तंवर आणि सोनाली ठक्कर उर्फ सोनाली आदित्य देसाई यांच्यावर दिव्यांगांबद्दल असंवेदनशील टिप्पणी केल्याचे आरोप झाले. याच प्रकरणात न्यायालयाने या सर्वांना आपले यूट्यूब चॅनेल आणि पॉडकास्टवर दिव्यांगांची बिनशर्त माफी मागण्याचे निर्देश दिले.

न्यायालयाने रणवीर » पान २ वर

## एआयमुळे २५ वर्षांनंतर महिलेचा आवाज परतला

■ लंडन

**इंग्लंडमधील उत्तर लंडन येथील ५५ वर्षीय सारा इझेकिएल या महिलेला तब्बल २५ वर्षांनंतर स्वतःचा हरवलेला आवाज वेगळ्या पद्धतीने पुन्हा मिळाला आहे. एआय तंत्रज्ञानाने हे शक्य झाले आहे.**



२५ **वर्षांपूर्वी** सारा यांना मोटर न्यूरॉन डिजी या दुर्धर आजाराचे निदान झाले होते. या आजारामुळे त्यांच्या शरीरातील नसा आणि स्नायूंमध्ये कमकुवतपणा येऊन, हळूहळू बोलणे, गिळणे आणि चालणे अशक्य झाले. काही काळानंतर त्यांचा आवाजही पूर्णतः हरवला. परंतु त्यांच्या कुटुंबाकडे असलेल्या एक आठ सेकंदांच्या जुन्या व्हिडिओ क्लिपमुळे एक आश्चर्यकारक गोष्ट घडली. त्या व्हिडिओमध्ये सारा त्यांच्या मुलीशी संवाद साधत होत्या. या ऑडिओ क्लिपवर आधारित आवाजाचे » पान २ वर

## रामपाल महाराजांच्या भक्तांचा देहत्याग करण्याचा निर्णय मागे

■ बंगळुरू

**परमेश्वराचे** आम्हाला बोलावणे आले आहे. त्यामुळे आम्ही ८ सप्टेंबर रोजी कर्नाटक राज्याच्या अथनी येथे देहत्याग करणार, अशी भूमिका रामपाल महाराज यांच्या २० भक्तांनी घेतली होती. यामध्ये पुण्यातील १०, अनंतपूरमधील ५ आणि विजयपूरमधील ५ भाविकांचा समावेश होता. त्यामुळे कर्नाटकातील सीमा भागासह महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली. मात्र, काही वेळातच अन्य मठांच्या महाराजांनी या भक्तांची समजूत काढल्याने त्यांनी देहत्याग करण्याचा निर्णय मागे घेतला. यानंतर परराज्यातून आलेल्या भाविकांना आपल्या घरी परत पाठवण्यात आले.

या प्रकरणी अनंतपूर येथील इरकर कुटुंबाला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या कुटुंबातील पाच जणांनी देहत्यागाचा निर्णय घेतला होता. हे सर्वजण रामपाल महाराजांचे शिष्य असल्याचे सांगितले जाते. ६ ते ८ सप्टेंबरदरम्यान अनंतपूर येथे विशेष महापूजा आयोजित करण्यात आली आहे. तिचा समारोप देहार्पणाने केला जाणार आहे. हे सारे पाहण्यासाठी भक्तांचा मोठा समुदाय जमणार होता. इरकर यांनी याबाबत बोलताना सांगितले की, रामपाल महाराजांकडून आम्ही दीक्षा घेतली आहे. आता आयुष्याची इतिकर्तव्यता झाली असून, ८ सप्टेंबर रोजी परमेश्वराचे बोलावणे आले आहे. त्यानुसार ६ सप्टेंबरला सकाळी महापूजेला सुरुवात होईल.

## महाजन-भुजबळांनंतर आता शिंदेही कुंभमेळ्याच्या आखाड्यात

■ नाशिक

**नाशिकमध्ये** २०२६-२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन जसजसे वेग घेत आहे, तसतसे महायुतीतील नेत्यांमध्ये वर्चस्वाची चुरस वाढताना दिसत आहे. सुरुवातीला कुंभमेळा मंत्री म्हणून भाजपाचे गिरीश महाजन हेच नियोजनात पुढे होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व अन्न-नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आढावा बैठक घेऊन प्रवेश केला. आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील या नियोजनात उतरले असून, ते लवकरच कुंभमेळ्याबाबत स्वतंत्र बैठक घेणार असल्याची माहिती मंत्री दादा भुसे यांनी दिली. दरम्यान कुंभमेळ्यासाठी हजारो कोटींचा निधी मिळणार असल्यानेच महायुतीतील नेते पालकमंत्रिपद मिळावे आणि नियोजनात आघाडी घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

नाशिकच्या पालकमंत्री पदावरून महायुतीत वाद सुरू आहे. कुंभमेळा व आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या पदाला विशेष महत्त्व आले आहे. गिरीश महाजन » पान २ वर


चंदनवाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सी. पी. टँक रोड

# हुजूरसाहेब नांदेड वंदे भारत शीख समाजात उत्साह

■ मुंबई

**मुंबईहून** हुजूरसाहेब नांदेड वंदे भारत रेल्वेगाडी उद्यापासून सुरू होत आहे. या नव्या रेल्वेगाडीमुळे शीख समाजात उत्साहाचे वातावरण आहे.

वंदे भारत रेल्वेगाडी उद्यापासून नांदेड हुजूरसाहेब इथून सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी सुटेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या गाडीला हिरवा झेंडा दाखवतील. ०२७०५ अप या क्रमांकाची ही रेल्वेगाडी परभणी, जालना, औरंगाबाद, मनमाड, नाशिक रोड, कल्याण, ठाणे व दादर येथे थांबेल. परतीच्या प्रवासाला ही रेल्वे पहाटे पाच वाजता सुटणार असून, ती दुपारी २.२५ मिनिटांनी नांदेडला पोहोचेल. आठवड्यातून सहा दिवस ही वंदे भारत चालणार असून, बुधवारी नांदेडहून व गुरुवारी मुंबईहून ही गाडी सुटणार नाही. या मार्गावर वंदे भारत रेल्वे सुरू करावी ही गुरु नानक लेवा संगतची मागणीही याद्वारे पूर्ण झाली आहे.

# गणेशोत्सवापूर्वी कोकण रो-रो सेवेचा मुहूर्त हुकला

■ मुंबई

**कोकणवासीयांसाठी** गणेशोत्सवापूर्वी रो-रो सेवा सुरू करण्याचा दावा मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी केला होता. मुंबई-दिघी आणि मुंबई-काशीद या मार्गांवर ही सेवा सुरू करण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र तांत्रिक अडचणींमुळे या सेवेला अद्याप परवानगी मिळालेली नसल्याने गणेशोत्सवाचा मुहूर्त हुकला आहे. त्यामुळे रो-रो बोटने कोकणात जाण्याचे कोकणवासीयांचे स्वप्न भंगले आहे. मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था, खासगी बस चालकांची लूट, रेल्वे तिकिटांचा तुटवडा आणि एसटी गाड्यांची गर्दी यामुळे गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या भाविकांना दरवर्षी अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर वेळ व पैशांची बचत व्हावी म्हणून रो-रो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या सेवेने १४ तासांचा प्रवास केवळ ६ तासांत होणार होता. मात्र, अद्याप केंद्राच्या नौकानयन महासंचालनालयाकडून अंतिम मंजुरी मिळालेली नाही. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी काही दिवसांत मंजुरी मिळेल, असे सांगितले.

# केरळच्या आमदाराला काँग्रेसने निलंबित केले

■ कोची

**काँग्रेसने** केरळातील आमदार राहुल ममकुटाथिल यांचे पक्ष सदस्यत्व सहा महिन्यांसाठी निलंबित केले आहे. अभिनेत्री गिनी जॉर्ज आणि लेखिका हनी भास्करन यांना अश्लील मेसेज पाठवल्याचा आरोप काँग्रेस आमदारावर आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आमदार ममकुटाथिल यांना केरळ युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. पक्षाने निलंबित केल्यामुळे ममकुटाथिल यांना केरळ विधानसभेच्या आगामी अधिवेशनात सहभागी होता येणार नाही. ते नोव्हेंबर २०२४ मध्ये पल्लकड विधानसभेसाठी पोटनिवडणुकीत विजयी झाले होते.

## देश विदेश

# चंदीगडच्या खड्ड्यांत लावले काँग्रेसने भाजपाचे कमळ

■ चंदीगड

**केंद्रशासित** प्रदेश असलेल्या चंदीगडमध्ये रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. याच्या निषेधार्थ काँग्रेस कार्यकर्त्यांनी खड्ड्यांमध्ये भाजपाचे कमळ चिन्ह लावून अनोखे निषेध आंदोलन केले. खड्डा पडलेल्या भागाभोवती पांढरे वर्तुळ करत त्यामध्ये कमळचिन्ह लावले.

केंद्रापासून ते चंदीगड महापालिकेत भाजपाची सत्ता आहे. तरीही रस्ते दिवसेंदिवस अधिक खराब होत आहेत, असा आरोप काँग्रेसने केला. ३० वर्षांत पहिल्यांदाच चंदीगडमधील रस्त्यांची इतकी दुरवस्था झाल्याचा आरोपही आंदोलकांनी केला.

गेल्या जानेवारीत झालेली महापालिका निवडणूक भाजपाने जिंकली. हरप्रित कौर बाबला यांनी १९ विरुद्ध १७ च्या फरकाने आप-काँग्रेस उमेदवाराचा पराभव करत महापौरपदाची निवडणूक जिंकली.

# अयोध्या राजघराण्यातील विमलेंद्र मिश्रा यांचे निधन

■ अयोध्या



**अयोध्येच्या** राजघराण्याचे वारस व श्री राम जन्मभूमी ट्रस्टचे विश्वस्त विमलेंद्र मोहन प्रताप मिश्रा यांचे निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. अयोध्येत ते राजासाहब म्हणून प्रसिद्ध होते. राजासाहब आपल्या घरी असताना अचानक त्यांचा रक्तदाब कमी झाला व त्यांची प्राणज्योत विझली. त्यांच्या निधनाने अयोध्या व उत्तर प्रदेशात दुःखाची लाट पसरली आहे. राम जन्मभूमी मंदिर निर्माणातील ते एक महत्त्वाचे शिलेदार होते. मंदिर निर्माणाच्या प्रचारात त्यांचा मोठा वाटा होता. राजासाहब यांनी अयोध्येतील सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीत पुढाकार घेतला होता.

# इंटेलचा १० टक्के हिस्सा डोनाल्ड ट्रम्प सरकारकडून खरेदी

■ न्यूयॉर्क

**इंटेल** सेमीकंडक्टर कंपनीतील १० टक्के हिस्सा ट्रम्प सरकारने ८.९ अब्ज डॉलरला खरेदी केला. त्यासाठी चिप्स ॲक्ट अनुदान आणि सिक्युर एन्क्लेव्ह प्रोग्रॅमद्वारे निधी पुरवला गेला. त्यामुळे अमेरिकन तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्राला चालना मिळेल, असे इंटेलचे सीईओ लिप-बू तान यांनी म्हटले.




अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या कराराची घोषणा केली. या करारानुसार सरकारने इंटेलचे ४३३.३ दशलक्ष शेअर २०.४७ डॉलर प्रति शेअर या दराने खरेदी केले, जो शुक्रवारच्या बंद भावापेक्षा कमी आहे. त्यामुळे सरकारला कागदोपत्री १.९ अब्ज डॉलरचा नफा झाला. या गुंतवणुकीसाठी ५.७ अब्ज डॉलर्स चीप्स ॲक्ट अनुदान आणि ३.२ अब्ज डॉलर सिक्युर एन्क्लेव्ह प्रोग्रॅममधून निधी देण्यात आला आहे. हा हिस्सा खरेदी केल्याने सरकार इंटेलमधील सर्वात मोठ्या भागधारकांपैकी एक बनले आहे. परंतु सरकारला मतदानाचा अधिकार किंवा संचालक मंडळावरील प्रतिनिधित्व मिळालेले नाही.

# दिल्ली मेट्रोच्या तिकीट दरात १ ते ४ रुपयांपर्यंत वाढ

■ नवी दिल्ली

**दिल्ली** मेट्रो रेल्वे महामंडळाने (डीएमआरसी)आजपासून प्रवासी तिकीट दरात किरकोळ वाढ जाहीर केली. प्रवासाच्या अंतरानुसार तिकीट दरात १ ते ४ रुपयांपर्यंत वाढ झाली तर एअरपोर्ट एक्स्प्रेस लाईनसाठी ही वाढ ५ रुपयांपर्यंत केली आहे. तिकीट दरवाढीची ही घोषणा डीएमआरसीने त्यांच्या अधिकृत एक्स खात्यावरून केली.



डीएमआरसीच्या अधिकृत माहितीनुसार, नवीन दर आजपासून लागू केले आहेत. यामध्ये ० ते २ कि.मी. पर्यंतच्या प्रवासासाठी पूर्वीचा १० रुपये दर ११ रुपये झाला आहे. तर २-५ किमीसाठी २१ रुपये, ५-१२ किमीसाठी ३२ रुपये, १२-२१ किमीसाठी ४३ रुपये, २१-३२ किमीसाठी ५४ रुपये, ३२ किमीपेक्षा जास्त अंतरासाठी ६४ रुपये झाली आहे. राष्ट्रीय सुट्ट्या व रविवारीही सुधारित दर लागू राहणार आहेत. त्यामध्ये ०-५ किमीसाठी ११ रुपये, ५-१२ किमीसाठी २१ रुपये, आणि ३२ कि.मी.पेक्षा अधिक अंतरासाठी ५४ रुपये दर निश्चित केला आहे. यापूर्वी २०१७ मध्ये दिल्ली मेट्रोच्या तिकीट दरात शेवटची वाढ झाली होती. त्यावेळी किमान तिकीट ८ रुपये वरून १० रुपये आणि जास्तीतजास्त ५० रुपये झाली होती. मात्र या दरवाढीमुळे प्रवाशांमध्ये नाराजी असल्याची चर्चा आहे. एका प्रवाशाने सांगितले की, मध्यमवर्गीय कुटुंबांना ही दरवाढ परवडणारी नाही. सरकारने मेट्रोचे दर जास्त न करता सर्वसामान्यांसाठी सोयीचे ठेवावेत. तर दुसऱ्याने सांगितले की, मेट्रो कार्ड सर्व ठिकाणी चालत नाही. हे मोठे आव्हान आहे. २-४ रुपये वाढवले तरी चालेल, पण सुविधा सुलभ कराव्यात.

# लंडनमधील रेस्टॉरंटमध्ये जाळपोळ! दोघांना अटक

■ लंडन


**५ जण जखमी**

**लंडनमधील** भारतीय रेस्टॉरंटमध्ये जाळपोळ केल्याने एकच गोंधळ उडाला. याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत मुलासह व्यक्तीला अटक केली. या जाळपोळीत ५ जण जखमी झाले. त्यात ३ महिलांचा समावेश आहे.

लंडनच्या लिफोर्ड भागातील इंडियन एरोमा या रेस्टॉरंटमध्ये जाळपोळ केल्यानंतर आग लावली. त्यात जखमी झालेल्या पाच जणांना प्राथमिक उपचारानंतर रुग्णालयात नेण्यात आले. यापैकी एक महिला आणि एका पुरुषाची प्रकृती चिंताजनक आहे. या आगीत आणखी दोघे जण जखमी झाले. पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच ते निघून गेले. त्यांचा शोध घेतला जात आहे. याप्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली असून चौकशी सुरू असल्याचेही पोलिसांनी सांगितले. या आगीमुळे रेस्टॉरंटचे मोठे नुकसान झाले आहे.

# अमेरिकेचे प्रसिद्ध अभिनेते जेरी ॲडलर यांचे निधन

■ न्यूयॉर्क



**प्रसिद्ध** अमेरिकन अभिनेते जेरी ॲडलर यांचे वयाच्या ९६ व्या निधन झाले. अभिनेता फ्रँक जे. रेली यांनी एक्स पोस्ट करत त्यांच्या निधनाची माहिती दिली.

जेरी ॲडलर यांनी वयाच्या ६० व्या वर्षी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले होते, हीच त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात विलक्षण गोष्ट मानली जाते. त्याआधी जवळपास तीन दशके त्यांनी पडद्यामागे रंगमंच व्यवस्थापक आणि दिग्दर्शक म्हणून उल्लेखनीय काम केले. माय फेअर लेडीसह अनेक ब्रॉडवे प्रॉडक्शनमध्ये त्यांनी मोलाची भूमिका बजावली होती. द सोप्रानोस या लोकप्रिय मालिकेत हरमन हेश रॅबकिनची भूमिका करून ते विशेष चर्चेत आले. तसेच द गुड वाईफ आणि द गुड फाईटमध्ये वकील हॉवर्ड लायमनच्या भूमिकेतून त्यांनी वेगळे स्थान निर्माण केले. रंगमंचावरील त्यांच्या योगदानाबरोबरच टेलिव्हिजन विश्वातही त्यांनी ठसा उमटवला. विविध मालिका आणि शोमध्ये ते महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसले.

# कुडाळचा सेल्फी पॉईंट बंद गणेशोत्सवापूर्वी सुरू करा

■ कुडाळ

**नागरिकांची मागणी**

**शहराच्या** सौंदर्यात भर घालणारा आणि प्रवाशांसाठी आकर्षण ठरलेला कुडाळ एसटी स्थानकासमोरील सेल्फी पॉईंट गेल्या काही दिवसांपासून बंद अवस्थेत आहे. गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आला असताना, मुंबईहून मोठ्या संख्येने गावाकडे येणाऱ्या चाकरमान्यांचे लक्ष या बंद सेल्फी पॉईंटकडे जाणार असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन गणेशोत्सवापूर्वी सेल्फी पॉईंट सुरू करावा, अशी मागणी होत आहे.

सुमारे पाच वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला हा सेल्फी पॉईंट लवकरच कुडाळची ओळख बनला होता. विशेषतः रात्रीच्या वेळी आकर्षक प्रकाशयोजनेमुळे हा परिसर उजळून निघत असे. एसटी स्थानकावर उतरणाऱ्या प्रवासी व चाकरमान्यांसाठी ते एक रमणीय ठिकाण ठरले होते. अनेकांनी येथे फोटो काढून कुडाळच्या आठवणी जपल्या आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हजारो चाकरमानी मुंबईहून गावी परतणार आहेत. ते कुडाळ एसटी स्थानकावर उतरल्यावर बंद अवस्थेतील हा सेल्फी पॉईंट पाहून निराश होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, केवळ शहराची शोभा वाढविण्यासाठी नव्हे, तर बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत अधिक उत्साहाने व्हावे, यासाठी हा सेल्फी पॉईंट लवकरात लवकर सुरू करावा, अशी मागणी जनतेकडून होत आहे.

# वादळ-पावसामुळे बोटी किनाऱ्यावर मच्छिमारांची नुकसानभरपाईची मागणी

■ भाईंदर

**मासेमारीचा** हंगाम १ ऑगस्टपासून सुरू झाला असला, तरी सुरुवातीलाच आलेल्या वादळ व मुसळधार पावसामुळे मच्छिमारांना मोठा फटका बसला आहे. हवामान खात्याने १६ ते २१ ऑगस्टदरम्यान ५० ते ६० किमी वेगाने वादळी वाऱ्यांसह अतिवृष्टीचा इशारा दिल्याने बहुतांश बोटी मच्छिमारांनी किनाऱ्यावरच थांबवल्या आहेत. त्यामुळे डिझेल, बर्फ, किराणा, खलाशांचा पगार आदींवर झालेला खर्च वाया गेला असून, मच्छीमार आर्थिक अडचणीत सापडले आहेत.



राज्यात १ जून ते ३१ जुलैदरम्यान मासेमारीवर बंदी असते. त्यानंतर १ ऑगस्टपासून हंगाम सुरू होतो. मात्र हंगामाच्या सुरुवातीलाच आलेल्या प्रतिकूल हवामानामुळे अपेक्षित मासेमारी होऊ शकली नाही. महागाईमुळे इंधन, जाळी, दुरुस्ती, किराणा आदी खर्च आधीच वाढलेला असताना, वादळामुळे झालेले नुकसान मच्छिमारांच्या कुटुंबांवर संकट बनले आहे.

मच्छीमार म्हणाले की, एका बोटीवर किमान १५ ते २० कुटुंबांचे पोट अवलंबून असते. बोट ही आमच्यासाठी आईसमान आहे. मात्र वादळाच्या इशाऱ्यामुळे समुद्रात न जाता रिकाम्या हाताने परत यावे लागले. डिझेल, बर्फ, किराणा खर्च वाया गेला. खलाशांना पगार द्यावाच लागतो. पहिल्याच खेपेत मोठे नुकसान झाल्याने आम्ही अडचणीत आलो आहोत. त्यामुळे शासनाने तत्काळ पंचनामे करून आम्हाला नुकसान भरपाई द्यावी.

# विद्यार्थ्याला वाचवताना शिक्षकाचा जीव गेला

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगरमध्ये वेरूळ लेणी परिसरात विद्यार्थ्याला वाचवताना शिक्षकाचाही जीव गेल्याची दुर्घटना घडली. राजवर्धन वानखेडे (२९) हे शिक्षक आपल्या क्लासमधील ९ विद्यार्थ्यांना घेऊन वेरूळ लेणी पाहण्यासाठी सहलीवर आले होते. लेणीची पाहणी करून झाल्यानंतर सर्वजण डोंगरावर असलेल्या जोगेश्वरी कुंडाकडे गेले. याचवेळी चेतन पगडे (१७) या विद्यार्थ्याचा पाय घसरून तो कुंडातील खोल पाण्यात पडला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन राजवर्धन यांनी क्षणाचाही विलंब न करता पाण्यात उडी घेतली. चेतनला वाचवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मात्र पाण्यात घाबरून गेलेल्या चेतनने शिक्षकाला मिठी मारली आणि दोघेही बुडाले.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते शनिवार
MAHARASHTRA WEEKLY LOTTERY
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
₹ 16 लाख (₹8 लाखाची x 2 बक्षीसे) तिकीट ₹ 50/-
पहिले बक्षीस रु. 8 लाख
महाराष्ट्र वैभवलक्ष्मी
सोडत दि.04/07/2025 विजेता तिकीट क्र: VL-06-4993
रिटेलर: जय महाराष्ट्र, अंधेरी
स्टॉकिस्ट: सिद्धी समर्थ एजन्सी, दादर-मुंबई
महाराष्ट्र अक्षय
सोडत दि.09/07/2025 विजेता तिकीट क्र: AK-00-5587
रिटेलर: सिद्धी विनायक, दादर-मुंबई
स्टॉकिस्ट: अंबिका एजन्सी, दादर-मुंबई
पहिले बक्षीस रु. 8 लाख
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

# उड्डाणपूल महिनाभरापूर्वी पूर्ण! उद्‌घाटनाची प्रतीक्षा

■ पुणे

**सिंहगड** रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण होऊन तब्बल एक महिना उलटला. मात्र अद्यापही या पुलाचे उद्‌घाटन झालेले नाही. प्रशासनाकडून सुरू असलेल्या दिरंगाईवरून मनसेने आक्रमक भूमिका घेत आज सकाळी ११ वाजताच्या सुमारास हा पूल वाहतुकीसाठी सुरू करण्याचा निर्णय घेतला.

सिंहगड रस्त्यावर होणारी प्रचंड वाहतूक कोंडी लक्षात घेता हा पूल वाहतूक सुरळीत करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. मात्र उद्‌घाटनास होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. स्थानिक आमदार व राज्यमंत्री माधुरी मिसाळ या परदेशात असल्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीमुळे उद्‌घाटन रखडले आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नुकतेच विद्यापीठ चौकातील उड्डाणपुलाचे उद्‌घाटन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत पार पडले. मात्र सिंहगड रस्त्यावरील पुलाकडे दुर्लक्ष का, असा सवालही मनसेने केला आहे. पुलाचे काम पूर्ण असूनही केवळ नेत्यांच्या प्रतीक्षेमुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत असल्याची प्रतिक्रिया मनसे पदाधिकाऱ्यांनी दिली.

# मुंबई शेयर बाजारात ३२९ अंकांची वाढ

**मुंबई** - मुंबई शेयर बाजाराच्या निर्देशांकात आज दिवसअखेर ३२९.०६ अंकांची वाढ होऊन तो ८१ हजार ६३५.९१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय बाजाराचा निफ्टीही ९७.६५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ९६७.७५ अंकांवर बंद झाला. शेयर बाजारात आज आयटी कंपन्यांच्या शेयर्सची मोठ्या प्रमाणात विक्री झाली.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र सह्याद्री साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते रविवार
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले बक्षिस ₹ 10000
तिकीट ₹ 15/-
महाराष्ट्र सह्याद्री राजलक्ष्मी
सोडत दि.18/07/2025 विजेता तिकीट क्र: SR-01-3909
रिटेलर आणि स्टॉकिस्ट:
हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते रविवार
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले सामाईक बक्षीस ₹ 10000/-
तिकीट ₹10/-
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी धन
सोडत दि.04/07/2025 विजेता तिकीट क्र: MG-01-2869
स्टॉकिस्ट: प्रिन्स लॉटरी सेंटर ॲन्ड जनरल स्टोर्स, कल्याण
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी शुभ
सोडत दि.15/07/2025 विजेता तिकीट क्र: MG-08-2025
रिटेलर: सिद्धीविनायक लॉटरी सेंटर, दादर स्टॉकिस्ट: अंबिका एजन्सी, दादर
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी भाग्यशाली
सोडत दि.28/07/2025 विजेता तिकीट क्र: MG-09-6888
स्टॉकिस्ट: श्री सिद्धी समर्थ एजन्सी, दादर
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र गजलक्ष्मी साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते रविवार
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले बक्षिस ₹ 10000
तिकीट ₹ 20/-
महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु
सोडत दि.03/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-02-5529
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा
महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम
सोडत दि.14/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-5726
रिटेलर: कार्तिक लॉटरी सेंटर, दादर
स्टॉकिस्ट: श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर
महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र
सोडत दि.18/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-5379
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: पवार लॉटरी, ठाणे
महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु
सोडत दि.24/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-8988
रिटेलर: जय संतोषी माँ लॉटरी सेंटर, मुलुंड
स्टॉकिस्ट: सुमित एजन्सी, मुंबई
महाराष्ट्र गजलक्ष्मी मंगल
सोडत दि.29/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-4585
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवा काळ
॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# सण छोटे पण धन मात्र मोठे

आजपासून जवळपास दिवाळीपर्यंत छोट्या मोठ्या सणांचा एक महोत्सवच सुरू होतो. आजची हरितालिका, उद्याची गणेशचतुर्थी, ऋषीपंचमी, अनंतचतुर्दशी, भाद्रपदातला पितृपंधरवडा, अश्विनातली नवरात्र, कोजागिरी पौर्णिमा, अश्विन अमावास्येपासून सुरू होणारा दीपोत्सव, कार्तिकी एकादशी, त्रिपुरी पौर्णिमा आणि त्याच काळात असणारा तुळशी विवाहांचा धडाका एवढेच नव्हे तर मार्गशीर्षातले खंडोबाचे नवरात्र , दत्तजयंती असा हा सणांची रेलचेल असलेला कालावधी असतो. या संपूर्ण काळामध्ये लोकांमध्ये असणारा उत्साह शिगेला पोहचतो आणि बाजारामध्येदेखील याच सणासुदीसाठी खरेदी विक्रीची एकच झुंबड उडते. दरवर्षी त्याच पद्धतीने हे सगळे सणवार साजरे होऊनही उत्साहाची ऊर्जा मात्र दरवर्षी नवे रूप धारण करून येते. अशा प्रकारची सण उत्सवांची रेलचेल असणारी जगाच्या पाठीवर एकमेव हिंदू संस्कृती असावी. याची सर्वाधिक तीन वैशिष्ट्ये लक्षात येतात. एक म्हणजे समाज व्यवस्था टिकून राहाते. व्यक्तिगत स्तरावर मानसिक समाधान मिळते आणि हा सगळा वारसा पुढच्या पिढीकडे संक्रमित होत राहावा म्हणून नकळतपणे प्रयत्न होत राहातात. त्यातली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्तिगत किंवा कौटुंबिक स्तरावर या सणवारांमधून मानसिक समाधान मिळत असताना दुसरीकडे समाज व्यवस्थेसाठी आवश्यक ठरणारी आर्थिक उलाढाल प्रचंड प्रमाणात होते. समाधानाचे स्वरूप किंवा सण उत्सवांमधून घडून येणारे अर्थव्यवहार हे एकमेकांची धनसमृद्धी करणारे ठरतात. सण छोटे मोठे पण अनेक अर्थांनी मिळणारे धन तितकेच मोठे असते. असेच त्याचे वर्णन ठरते. गणेशोत्सवापूर्वीचा रविवारचा दिवस म्हणजे अवघ्या महाराष्ट्रातल्या बाजारपेठांमध्ये ओसंडून वाहाणारा उत्साह दिसत होता. अन्य सणवाराबरोबरच आपल्याकडे दहा दिवसांसाठी येणाऱ्या गणरायांचे योग्य ते आदरातिथ्य व्हावे यासाठी केली जाणारी खरेदी म्हणजेच स्वतःच्या खिशातले पैसे खर्च करून अमूल्य असे समाधान मिळवण्याचा तो एक भाग ठरतो. गणपती घरगुती असो किंवा सार्वजनिक असो. यानिमित्ताने गणेशमूर्ती तयार करणाऱ्या अक्षरशः हजारो मूर्तिकारांना केवळ रोजगार मिळतो असे नाही तर आपल्या कलेचा भक्तिपूर्ण होणारा सन्मान त्यांच्यासाठी फार मोठे समाधान देणारा ठरतो.

**संस्कृतीची शृंखला**

ही सणवारांची परंपरा भारतीय समाजजीवनाचा एक अविभाज्य अंग आहे. देशाच्या प्रत्येक प्रांतामध्ये शेकडो प्रकारचे सणवार, व्रतवैकल्य पार पडतात. या उपक्रमांमुळे समाजातला जवळपास प्रत्येक घटक या ना त्या कारणाने एकमेकांशी जोडलेला राहातो. वर्षभरातल्या या सणवारांच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, भावनिक, मानसिक, गरजा सहजपणे पूर्ण होत राहातात. या सर्व प्रक्रियेचा आपणही एक भाग आहोत. याचादेखील एक सुप्त अभिमान प्रत्येकाच्या मनामध्ये निर्माण होत असतो. महाराष्ट्रातील गणेशोत्सव हे त्याचे उत्तम निदर्शक ठरते. घराघरामध्ये या काळात गणपती पूजन तर होतेच. पण सार्वजनिक स्तरावरही त्याचे भव्य दिव्य रूप साकार होते आणि यातूनच कुटुंब, ते समाज यांच्यात एक सामाजिक नाते तयार होते, जे भावनिकदृष्ट्या आनंद देणारे ठरते. दरवर्षीच्या या गणेशोत्सवात एकट्या महाराष्ट्रात जवळपास चाळीस ते पन्नास हजार कोटींची उलाढाल होते. देशभरातला हा आकडा काही लाख कोटींवर जातो. यातून देशाच्या अर्थकारणाला मिळालेली चालना किंवा एकूण समाजासाठी आवश्यक असणारे अर्थचक्र अविरत चालू राहाते. हे सणवार जरी वर्षातून एकदाच येत असले तरी त्यासाठीची तयारी मात्र वर्षभर सुरू राहाते. येणाऱ्या उत्सवाचा अंदाज घेऊन आवश्यक ती तयारी आधीपासूनच करणे गरजेचे असते आणि त्या तयारीसाठी अक्षरशः अनेक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. मुंबईसारख्या महानगरात फुले दूर्वा किंवा छोट्या छोट्या देखाव्यांची विक्री करणाऱ्यांची मोठी कमाई या काळात होते. या विक्रेत्यांच्या वार्षिक कमाईचे गणित या सणउत्सवांशी निगडित असते. केवळ वस्तूंच्या विक्रीतून अनेकांचे आर्थिक विघ्न हा गणराय दूर करीत असतो. आता तर त्याला तंत्रज्ञानाचीही जोड मिळालेली आहे. त्याच्याशी निगडितही अनेक व्यवसाय ऑनलाईन पद्धतीने सुरू राहातात.

**समाजाची स्वयंस्फूर्तता**

समाजातला जवळपास सत्तर टक्के वर्ग या वेगवेगळ्या सणउत्सवांशी घनिष्ठपणे जोडला जातो. म्हणजे व्यक्तिगत स्तरापासून ते सामाजिक स्तरापर्यंत घडून येणारे हे अर्थकारण धनाशी निगडित तर असतेच पण त्यातून मिळणारा लाभ समाधान मिळवून देतो. शेकडो वर्षापासूनची ही सणउत्सवांची परंपरा म्हणजे समाजातल्या सत्प्रवृत्ती तर टिकवून ठेवते. शिवाय संस्कृतीचा गौरव सातत्याने वाढत ठेवण्याचेही काम या निमित्ताने होते. म्हणूनच सण, उत्सव हे संस्कृतीची शृंखला टिकवून ठेवणारे अतिशय भक्कम दुवे ठरतात. विशेष म्हणजे यात व्यक्तिगत किंवा सामाजिक स्तरावरची स्वयंस्फूर्तता सर्वाधिक महत्त्वाची ठरते. कोणत्याही सरकारी मदतीशिवाय किंवा सरकारी हस्तक्षेपाशिवाय लोकांकडूनच या सणउत्सवाचे आयोजन होते आणि त्यातली अधिकाधिक शिस्त आणि पावित्र्य पाळण्याचा प्रयत्न होतो. अशा या स्वयंस्फूर्त उपक्रमांना कोणतेही गालबोट लागू नये किंवा कोणीही त्याचा गैरफायदा घेऊ नये म्हणून सरकारकडून केली जाणारी व्यवस्था हा त्यांच्या जबाबदारीचा भाग ठरतो. परंतु या सगळ्या सणउत्सवांचे नियोजन व्यक्तिगत, कौटुंबिक किंवा सामाजिक स्तरावर स्वयंस्फूर्तीने घडून येत असते. ज्यामध्ये सरकारला कोणताही खर्च करावा लागत नाही. उलट समाजच स्वतःचे पैसे खर्च करून हे सणवार साजरे करतो. ही प्रवृत्ती इतकी अमूल्य स्वरूपाची म्हणावी लागेल की, जी भारताच्या कुटुंब व्यवस्थेचे किंवा समाजव्यवस्थेचे एक विलोभनीय रहस्य म्हणावे लागते. मग भारतीय संस्कृती का टिकून आहे, याबाबतच्या सगळ्या शंकाकुशंकांना या सणांच्या शृंखलेतून परस्पर उत्तर मिळते. जर एवढा मोठा सामाजिक उद्देश साध्य होत असेल तर तेसुद्धा त्या त्या राष्ट्रसाठी तितकेच मोठे धनच म्हणावे लागते.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**शरीराला बिघडवणारे अन्न, मनाला बिघडवणारे विचार व मनस्थितीला बिघडवणारे लोक यांच्यापासून लांब राहणे आपल्या हिताचेच असते.**

## पंचांग

**मंगळवार, २६ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



**भाद्रपद शुक्ल तृतीया**
**नक्षत्र : हस्त**

**रवी उदय- ०६-२४**
**रवी अस्त- १८-५७**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कन्या**

**हरितालिका तृतीया; स्वर्ण गौरी व्रत; सामश्रावणी**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### ड्राय फ्रूट्स मोदक



★ **साहित्य -** ५ ते ६ खजूर, १/२ कप भाजलेले बदाम, १/२ कप काजू, १/२कप ड्राय फ्रूट्स, मॅपल सिरप, मोदक मोल्ड

★ **कृती-** ड्रायफ्रुट्सचे मोदक बनवण्यासाठी ड्रायफ्रुट्स हलके सोनेरी तपकिरी होईपर्यंत भाजून घ्या. नंतर खजूरमधील बिया काढून टाका. एक ग्राइंडर घ्या, त्यात सर्व साहित्य एकत्र करा आणि ते कणिकसारखे होईपर्यंत बारीक करा. मोदक बनत नाहीत असे वाटत असेल तर आणखी काही खजूर घालून पीठ मळून घ्यावे. ते तयार झाल्यावर, मॅपल सिरपने साच्याला ग्रीस करा आणि या मिश्रणाचा मोठा भाग घ्या आणि साच्यात घाला. एक परिपूर्ण आकार तयार करण्यासाठी सर्व बाजूंनी पुरेसे साहित्य घाला. त्याचप्रमाणे सर्व मोदक बनवा आणि बनवल्यानंतर फ्रीजमध्ये थंड होण्यासाठी ठेवा. सुमारे १ तास ठेवा. फ्रीजमधून मोदक काढा, प्लेटमध्ये ठेवा आणि बाप्पाला नैवेद्य दाखवा.

# १ वर्षानंतर परतणारी मीराबाई चानू चमकली
## कॉमनवेल्थ चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले

**टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक विजेती भारताची स्टार महिला वेटलिफ्टर मीराबाई चानू तिच्या पुनरागमनात चमकली. तब्बल १ वर्षानंतर परतणारी मीराबाई चानू आज कॉमनवेल्थ चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले. महिलांच्या ४८ किलो वजनी गटात क्लीन अँड जर्कमध्ये चानूने एकूण १९३ किलो (८४+१०९ किलो) वजन उचलले आणि यादीत अव्वल स्थान पटकावले.**



■ अहमदाबाद

**३१ वर्षीय** चानूने गेल्या वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला होता आणि तेव्हापासून ती दुखापतींशी झुंजत आहे. कॉमनवेल्थ चॅम्पियनशिपमध्ये मीराबाईकडून चांगली कामगिरी अपेक्षित होती आणि तिने अपेक्षेप्रमाणे कामगिरी केली. २०२८ च्या लॉस एंजेलिस गेम्ससाठी नवीन ऑलिम्पिक वजन श्रेणी लागू झाल्यानंतर मीराबाईने ४९ किलोवरून ४८ किलो वजन उचलण्याचा निर्णय घेतला होता. मीराबाईने ४८ किलो वजनी गटात तिचे जागतिक अजिंक्यपद विजेतेपद आणि दोन राष्ट्रकुल क्रीडा पदके जिंकली आहेत परंतु सोमवारपूर्वी तिने २०१८ पासून त्यात भाग घेतला नव्हता.

चानूच्या पुनरागमनामुळे आगामी होणाऱ्या राष्ट्रकुल चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताला अधिक पदके मिळविण्याची संधी निर्माण झाली आहे.मणिपूरच्या मीराबाई चानूने आतापर्यंत विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करताना समाधानकारक कामगिरी केली आहे. आता ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या विश्व वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी मीराबाईने जोरदार सरावाला प्रारंभ केला आहे.२०२८ मध्ये होणाऱ्या लॉस एंजिल्स ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये नव्या वजन गटांचा समावेश असल्याने मीराबाईने ४९ किलो ऐवजी ४८ किलो वजन गटात प्रतिनिधीत्व करण्याचे ठरविले आहे.

# महिला विश्वचषकासाठी पाकिस्तानी संघ जाहीर

■ कराची



**भारत** आणि श्रीलंकेत ३० सप्टेंबरपासून होणाऱ्या महिला विश्वचषकासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने संघ जाहीर केला. या संघात ७ नवीन खेळाडूंना संधी देण्यात आली. नवीन खेळाडूंमध्ये आयमन फातिमा, नतालिया परवेझ, रमीन शमीम, सदाफ शमास, सादिया इक्बाल, शवाल झुल्फिकार आणि सय्यदा अरुब शाह यांचा समावेश आहे. फातिमा साना हिला पाकिस्तान महिला संघाची कर्णधार बनवण्यात आले आहे. पाकिस्तानचे सर्व सामने हायब्रिड मॉडेलवर खेळवले जातील श्रीलंकेत सर्व पाकिस्तान सामने हायब्रिड मॉडेलवर खेळवले जातील.

# गांगुली प्रशिक्षकाच्या भूमिकेत प्रिटोरिया कॅपिटल्सची जबाबदारी

■ डरबन



भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांना मोठी जबाबदारी मिळाली. दक्षिण आफ्रिकेतील एसए २० लीगच्या आगामी २०२६ हंगामापूर्वी गांगुली यांची प्रिटोरिया कॅपिटल्स या संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली. गांगुली प्रथमच कोणत्याही क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहेत. इंग्लंडचा माजी फलंदाज जोनाथन ट्रॉट यांनी प्रिटोरिया कॅपिटल्सच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर गांगुली यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली.

# महिला २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत मनू भाकर चौथ्या स्थानावर

■ श्यामकेंट



**दोन** ऑलिम्पिक पदके जिंकणारी भारतीय नेमबाज मनू भाकर आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत चौथ्या स्थानावर राहिली, ८ महिलांच्या अंतिम फेरीत भारताची ईशा सिंग सहाव्या स्थानावर राहिली. मनू भाकरने २५ गुण मिळवले आणि ती तिसऱ्या स्थानावर राहिलेल्या व्हिएतनामच्या तू विन्ह त्रिन्हपेक्षा ४ गुणांनी मागे राहिली. तर ज्युनियर गटात भारतीय नेमबाजींचे वर्चस्व राहिले.

महिलांच्या ज्युनियर २५ मीटर पिस्तूल फायनलमध्ये भारताच्या पायल खत्रीने ३६ गुणांसह सुवर्णपदक जिंकले तर नाम्या कपूरने (३०) रौप्य आणि तेजस्विनीने (२७) कांस्यपदक जिंकले. या तिघांनीही १७०० गुणांसह सांघिक गटात रौप्यपदक जिंकले. कोरियाने सुवर्ण आणि कझाकस्तानने कांस्यपदक जिंकले. पात्रता फेरीत नाम्या आणि तेजस्विनीने पहिले आणि दुसरे स्थान पटकावले, तर पायल सहाव्या स्थानावर राहिली. यापूर्वी वरिष्ठ गटात चीनच्या युयू झांगने सुवर्ण आणि जिआरुइशुआन जिओने रौप्यपदक जिंकले. मनू, ईशा आणि सिमरनप्रीत कौर ब्रार या भारतीय त्रिकुटाने एकूण १७४९ गुणांसह कांस्यपदक जिंकले. त्यांनी चीन आणि दक्षिण कोरियाच्या मागे स्थान पटकावले. पात्रता फेरीत ईशाने अव्वल स्थान पटकावले तर मनू चौथ्या स्थानावर राहिली.

# प्रज्ञानंद सिंकफिल्ड कपमध्ये संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर

■ सेंट लुईस



**ग्रँड चेस** टूरच्या सिंकफिल्ड कपच्या सहाव्या फेरीत पोलंडच्या जान क्रिझ्टोफ दुडासोबत बरोबरी साधल्यानंतर भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंद संयुक्त दुसऱ्या स्थानावर राहिले. प्रज्ञानंदचा हा सलग पाचवा ड्रॉ होता. त्याचे आता सहा सामन्यांतून ३.५ गुण आहेत. अमेरिकेचा फॅबियानो कारुआना चार गुणांसह अव्वल स्थानावर आहे. प्रज्ञानंदसह अमेरिकेचा लेव्हॉन आरोनियन देखील दुसऱ्या स्थानावर आहे. विश्वविजेता डी गुकेश, अमेरिकेचा वेस्ली सो आणि सॅम्युअल सेव्हियन, फ्रान्सचा अलिरेझा फिरोजा आणि मॅक्सिम वाचियर-लाग्राव्ह हे संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहेत.

# २० वर्षांखालील विश्व कुस्ती स्पर्धेत अनिल मोरचे कांस्यपदक हुकले

■ सामुकोव्ह (बल्गेरिया)

**सामुकोव्हमध्ये** सुरू असलेल्या २० वर्षांखालील वयोगटाच्या विश्व कुस्ती चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताच्या ग्रीकोरोमन मल्लांनी खास निराशा केली. भारतीय मल्ल अनिल मोरला कांस्यपदकाच्या लढतीमध्ये पराभव पत्करावा लागला. या स्पर्धेमध्ये आतापर्यंत सुरजने ग्रीकोरोमन पद्धतीच्या कुस्तीमध्ये एकमेव कांस्यपदक मिळविले. ५५ किलो वजन गटातील झालेल्या कांस्यपदकासाठीच्या लढतीत जपानच्या मोरीशिताने अनिल मोरचा १०-७ अशा गुणांनी पराभव केला. मोरच्या पराभवामुळे भारताचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. या स्पर्धेमध्ये महिलांच्या विभागात भारतीय मल्लांनी दर्जेदार कामगिरी करत ७ पदकांसह सांघिक उपविजेतेपद मिळविले. तर पुरुषांच्या फ्री स्टाईल संघाला केवळ एकमेव रौप्यपदकावर समाधान मानावे लागत आहे. सुमीत मलिकने ५७ किलो वजन गटात रौप्यपदक मिळविले. ७७ किलो वजन गटात भारताच्या अमनने जपानच्या काडोडीचा ७-० असा एकतर्फी पराभव केला.

# २३ वर्षांखालील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र महिला संघ चमकला

■ रांची

**झारखंडच्या** रांची येथे सुरु असलेल्या २३ वर्षांखालील राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या महिला गटात महाराष्ट्र महिला कुस्ती संघाने २ सुवर्ण,२ रौप्य व ४ कास्य अशी एकूण ८ पदकांची कमाई केली. त्यामुळे महिला कुस्तीगीरांच्या कामगिरीमुळे महाराष्ट्राला दुसर्या क्रमांक मिळाला. ५५ किलो गटात अहिल्या शिंदेने सुवर्णपदक, ५९ किलो गटात धनश्री फंडने सुवर्णपदक, ५७ किलो गटात अश्लेशा बागडेने रौप्यपदक, ७६ किलो गटात वेदिका ससानेने रौप्यपदक, ६२ किलो गटात प्रगती गायकवाडने कांस्यपदक, ६५ किलो गटात अपेक्षा पाटीलने कांस्यपदक, ६८ किलो गटात अमृता पुजारीने कांस्यपदक आणि ७२ किलो गटात वेदांतिका पवारने कांस्यपदक पटकाविले.

# नेशन्स कपसाठी २३ सदस्यीय भारतीय फुटबॉल संघाची घोषणा

■ नवी दिल्ली

**२९ ऑगस्टपासून** सुरू होणार्या सीएएफए नेशन्स कपसाठी भारतीय फुटबॉल संघाचे नवनियुक्त मुख्य प्रशिक्षक खालिद जमील यांनी २३ सदस्यीय संघाची निवड केली. जमील अलीकडेच संघाचे प्रशिक्षक बनले आणि ही त्यांची पहिलीच स्पर्धा असणार आहे. भारतीय संघाचा समावेश गट बमध्ये आहे. ज्यामध्ये यजमान ताजिकिस्तान, गतविजेता इराण आणि अफगाणिस्तान यांचाही समावेश आहे.

भारत २९ ऑगस्ट रोजी यजमान ताजिकिस्तानविरुद्ध, तर १ सप्टेंबर रोजी इराणविरुद्ध आणि ४ सप्टेंबर रोजी अफगाणिस्तानविरुद्ध खेळेल. जमीलने २९ खेळाडूंच्या उपस्थितीत झालेल्या शिबिरानंतर अंतिम संघाची घोषणा केली. मोहन बागानने आपल्या सात खेळाडूंना स्पर्धेसाठी सोडण्यास नकार दिला. कारण हा कार्यक्रम फिफा विंडोचा भाग नाही.

# द बंगाल फाइल्सचा वाद

**'द ताश्कंद फाइल्स' आणि 'द काश्मीर फाइल्स' या चित्रपटांनंतर दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री आता 'द बंगाल फाइल्स' हा सिनेमा घेऊन प्रेक्षकांसमोर येत आहेत. येत्या ५ सप्टेंबर रोजी सिनेमागृहांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. हा सिनेमा स्वातंत्र्यापूर्वी बंगालमध्ये झालेल्या धार्मिक हिंसाचारावर आधारित असून मुस्लीम लीगचे डायरेक्ट क्शन डे दाखवण्यात आला आहे.**

'द बंगाल फाइल्स' चा ट्रेलर १६ ऑगस्ट रोजी प्रदर्शित झाल्यानंतर या सिनेमावर वादविवाद निर्माण होऊ लागले आहेत. त्यामुळे प्रदर्शनापूर्वीच या चित्रपटाबाबत अनेक वादविवाद सुरू झाले असून दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री व या सिनेमाविरोधात समाजामध्ये विरोधी सूर ऐकू येत आहेत, तर काहीजण सदर सिनेमाची प्रशंसा करत आहेत.

### काय आहे द बंगाल फाइल्स?

१९४६ साली बंगालमध्ये जो भयंकर धार्मिक हिंसाचार उसळला होता, त्याला 'ग्रेट कलकत्ता किलिंग' असे देखील म्हटले जाते. भारत-पाक फाळणीसाठी मुस्लिम लीगने १६ ऑगस्ट १९४६ या दिवशी डायरेक्ट ॲक्शन डे घोषित केला होता. यादिवशी कोलकातातील मुसलमान रस्त्यावर उतरले होते आणि त्यांनी आपल्यासाठी वेगळ्या पाकिस्तानाची मागणी केली होती. या मागणीमुळे कलकत्तामध्ये भयंकर दंगल उसळली होती आणि हा दिवस देशाची फाळणी करण्यास कारणीभूत ठरला होता. दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांचा दावा आहे की, कलकत्तामध्ये झालेल्या या धार्मिक हिंसाचारासंबंधी अशा अनेक गोष्टी आहेत, ज्यावर आत्तापर्यंत चर्चा केली गेली नाही आणि त्या जनतेसमोर येऊ दिल्या नाहीत. त्याच घटना आपल्या या सिनेमाद्वारे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे असे त्यांचे मत आहे.

परंतु कुणी या सिनेमाला विवेक अग्निहोत्री यांचा प्रपोगंडा म्हणत आहेत, तर काही विचारवंतांचे मत आहे की, देशाचा विकास व्हावा, देश पुढे जावा या उद्देशाने जर काही सत्य त्यावेळी राजकीय नेते आणि सरकारद्वारे लपवण्यात आले असतील, तर ती आता चित्रपटाद्वारे दाखवून देशामध्ये पुन्हा जातीय तिढा निर्माण करण्यात काय अर्थ आहे? आपला सिनेमा सत्य कथेवर आधारित आहे असा दावा विवेक अग्निहोत्री करत आहेत, पण त्यांच्याकडे सत्य पुरावे आहेत का? असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे.

इतिहासातील या दुःखद घटनेवर सिनेमा बनवल्यामुळे विवेक अग्निहोत्री वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेतच, परंतु आणखी आरोप त्यांच्यावर करण्यात आले आहेत. हा आरोप कोलकत्यातील श्री. शंतनु मुखर्जी यांनी केला आहे. मुखर्जींनी विवेक अग्निहोत्री यांच्या विरोधात पोलीस तक्रार केली आहे. त्यांच्या या तक्रारीमुळे चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात अडचणी आल्या, आणि भव्य दिव्य स्वरूपाऐवजी तो एका हॉटेलमध्ये प्रदर्शित करण्यात आला. काय कारण आहे की मुखर्जींनी अग्निहोत्री यांच्याविरोधात पोलीस तक्रार केली?

द बंगाल फाइल्समध्ये गोपालचंद्र मुखर्जी यांची व्यक्तिरेखा दाखवण्यात आली असून, ते मुसलमानांचे विरोधी होते असे सिनेमात दाखवण्यात आले आहे. परंतु गोपालचंद्र मुखर्जी यांचे नातू शांतनु मुखर्जी यांनी सिनेमाचा ट्रेलर पाहिल्यावर त्यावर विरोध दर्शवला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्या आजोबांची व्यक्तिरेखा सिनेमामध्ये चुकीच्या पद्धतीने दाखवण्यात आली आहे.

शांतनु मुखर्जीचा दावा आहे की, माझे आजोबा गरजूंना सहाय्य करत असत. चित्रपटामध्ये त्यांची व्यक्तिरेखा जशी दाखवण्यात आली आहे, तसे ते अजिबात नव्हते. शांतनु मुखर्जींनी अग्निहोत्रींवर हा देखील आरोप केला आहे की, माझ्या आजोबांचे चित्रण करण्यापूर्वी आमच्याशी दिग्दर्शकाने कुठलाही संवाद साधला नव्हता. अनेक राजकीय पक्षांनी हा राजकीय फायदे मिळवण्यासाठी केलेला राजकीय प्रचार असल्याचे सांगितले आहे.




### कोण होते गोपालचंद्र मुखर्जी?

गोपालचंद्र मुखर्जींना द बंगाल फाइल्स मध्ये हिंदूंचे संरक्षक आणि मुसलमानांचे विरोधी म्हणून दाखवण्यात आले आहे. गोपाल मुखर्जी यांची एक ऑडिओ मुलाखत १९९७ मध्ये बीबीसीचे पत्रकार एंड्रयू व्हाइटहेड यांनी घेतली होती, ज्यामध्ये मुखर्जींनी स्पष्टपणे सांगितले होते की, कोलकातामध्ये दंगली झाल्या, परंतु दुसऱ्या दिवशी त्यांनी सर्वांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मी माझ्या मुसलमान मित्रांना देखील सांगितले होते की, आपण भाऊ भाऊ आहोत, आणि तसेच राहू या; हिंसा योग्य नाही. परंतु माझे म्हणणे ऐकले गेले नाही, आणि लढून घेऊ पाकिस्तान अशा नारे घुमू लागले तेव्हा मी माझ्या हिंदू मुलांना देखील तयार राहण्यास सांगितले आणि त्यांना स्पष्ट केले की, जर त्यांनी आपल्या एकाला मारले तर आपण त्यांचे दहा माणसे मारायची. या मुलाखतीमध्ये ते या गोष्टीचा स्वीकार करतात की त्यांची भूमिका दंगलीमध्ये होती. त्यांच्या माणसांनी किती लोकांना मारले होते या प्रश्नावर ते उत्तर देतात की, आमच्याकडे याची यादी थोडीच आहे, पण आम्ही माणसे मारली होती. गोपाल चंद्र मुखर्जी यांचे वय १९९७ मध्ये ८३ होते. कोलकातामध्ये त्यांचे मटणाचे दुकान होते, ज्यामुळे त्यांना पाठा (बंगाली भाषेत पाठा म्हणजे बोकड) म्हटले जात असे. त्यांनी आपल्या मुलाखतीमध्ये या गोष्टीचा देखील स्वीकार केला होता की, हिंसेनंतर जेव्हा लोक आपली शस्त्रे गांधीजींकडे जमा करत होते, मी असे केले नाही. याचे कारण हे होते की, मी ती हत्यारे माझ्याकडे ठेवू इच्छित होतो, ज्याद्वारे मी माझ्या सूनामुलींचे संरक्षण केले होते. त्यांनी हे देखील सांगितले आहे की, मी हिंदू तरुणांना हे सांगितले होते की, दंगल करणार्यांशिवाय अन्य कुठल्याही व्यक्तीवर हल्ला करू नये आणि कुठल्याही महिलेसोबत वाईट कृत्य करू नये.

आता या सर्व पार्श्वभूमीवर 'द बंगाल फाइल्स' हा सिनेमा बंगालमध्ये प्रदर्शित होईल का याविषयी साशंकता निर्माण झाली आहे. मात्र या सर्व वादा-प्रतिवादामध्ये काय व कोण सत्य आहे, हे काळच ठरवेल.

# प्रिय आर्यन,



**बॉलीवूड** सुपरस्टार शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान दिग्दर्शक म्हणून मनोरंजन जगात पदार्पण करत आहे. काही काळापूर्वी तो वडिलांप्रमाणे अभिनेता बनणार असे बोलले जात होते. परंतु आर्यनने दिग्दर्शक बनण्याची आपली इच्छा जाहीर करून सर्वांना चकित केले. आता त्याचे हे स्वप्न पूर्ण झाले असून द बॅड्स ऑफ बॉलीवूड या नावाच्या वेब सीरिजद्वारे तो प्रेक्षकांसमोर लवकरच हजर होत आहे. त्यानिमित्ताने नुकताच एका मोठ्या भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये या सीरिजचे प्रमोशन करण्यात आले. यावेळी अनेक सेलिब्रिटीजने आर्यन आणि शाहरुख खान यांना शुभेच्छा दिल्या. मात्र या सेलिब्रिटींमध्ये सर्वाधिक चर्चा होत आहे ती अभिनेता सनी देओलची. सनीने आर्यन खानच्या या सीरिजचा टीझर आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत एक पोस्ट लिहिली आहे. त्याने लिहिले आहे की, प्रिय आर्यन, टीझर बघून असे वाटत आहे की तुझा शो खूप दमदार होणार आहे. बॉबसुद्धा तुझी प्रशंसा करत आहेत. तुझ्या वडिलांना नक्कीच तुझा अभिमान वाटेल. माझ्याकडून खूप शुभेच्छा आणि बेस्ट ऑफ लक, बेटा. चक दे फट्टे. सनी देओलच्या पोस्टवर त्याच्या चाहत्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. एका युजरने लिहिले आहे की, हा शो सुपरहिट होणार. तर दुसऱ्याने लिहिले आहे की, मी सनी देओल यांचा आदर करतो. अनेकजण आर्यनला शुभेच्छा देत आहेत. सनीची ही पोस्ट व्हायरल व्हायचे आणि त्याविषयी चर्चा व्हायचे कारण हे की, नव्वदच्या दशकात निर्माता-दिग्दर्शक यश चोप्रा यांच्या डर या सिनेमामध्ये सनी देओल आणि शाहरुख खान यांनी एकत्र काम केले होते आणि शाहरुखमुळे आपली भूमिका दुय्यम करण्यात आली असे त्यावेळी सनी देओलला वाटले होते.

# रामू-मनोज यांचे ८ वर्षांनी पुनर्मिलन

**निर्माता**-दिग्दर्शक रामगोपाल वर्मा लवकरच आपल्या नव्या सिनेमात पुलिस स्टेशन में भूत द्वारे दिग्दर्शनात पुनरागमन करत आहेत. या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारत आहेत अभिनेता मनोज बाजपेयी आणि जिनिलीया देशमुख. या हॉरर कॉमेडी चित्रपटात थ्रिलरचा तडका देखील असणार आहे. तब्बल आठ वर्षांनी राम गोपाल वर्मा आणि मनोज बाजपेयी या सिनेमाद्वारे एकत्र काम करत आहेत. यापूर्वी, मनोजने रामगोपाल वर्मासह 'सरकार ३' या सिनेमात एकत्र काम केले होते. सध्या पुलिस स्टेशन में भूत या चित्रपटाचे शूटिंग हैदराबाद येथे सुरू आहे. सिनेमाचे पहिले शूटिंग शेड्युल पूर्ण झाले आहे. या सिनेमाविषयी राम गोपाल वर्मा म्हणतात की, जेव्हा आपण घाबरतो, तेव्हा पोलीस स्टेशनात धाव घेतो, पण पोलीस घाबरले तर कुठे पळणार? या सिनेमाची कथा एका अशा पोलीसाची आहे, जो एका गँगस्टरला मारतो. परंतु त्या गँगस्टरचे भूत त्याच्या पोलीस स्टेशनमध्ये येते. राम गोपाल वर्मा यांनी आत्तापर्यंत रोमँटिक, राजकीय, गँगस्टर, थ्रिलर चित्रपट बनवले असले तरी हा त्यांचा पहिलाच हॉरर कॉमेडी चित्रपट आहे.





# मी स्वतःला भाग्यवान समजते

**पुन्हा** एकदा नंबर वन अभिनेता गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहुजा यांच्या घटस्फोटाची बातमी चर्चेचा विषय बनली आहे. एका वृत्तपत्राला माहिती देताना गोविंदाच्या सेक्रेटरीने ही बातमी खोटी असल्याचे सांगितले असले तरी आता गोविंदा आणि सुनीता यांची मुलगी टीना आहुजा याबाबतीत खुलासा केला आहे. टीनाने सांगितले की, या सर्व बातम्यांना काहीच अर्थ नाही. मी यावर काय बोलू? माझे वडील तर सध्या भारताबाहेर गेले आहेत. मी अशा खोट्या बातम्यांकडे लक्ष देत नाही. एक चांगले, प्रेमळ कुटुंब मला मिळाले आहे याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजते.

# भीक मागत आहे...

९० च्या दशकात आणि २००० दशकाच्या सुरुवातीच्या काही वर्षांत बॉबी डार्लिंग आपल्या खास प्रकारच्या भूमिकांसाठी प्रसिद्ध झाली होती. परंतु नंतर अचानक ती चित्रपटसृष्टीतून गायब झाली. आता अनेक वर्षांनी ती पुन्हा एकदा सिनेसृष्टीत परतली आहे आणि कामाच्या शोधात आहे. एका मुलाखतीत आपल्या समस्यांविषयी बोलताना, बॉबी डार्लिंगने सांगितले की, मी सध्या सिनेमा आणि टीव्ही या क्षेत्रात काम शोधत आहे. यासाठी मी कपिल शर्माकडे देखील मदत मागितली होती, की त्याने त्याच्या शोमध्ये मला लहान सहान भूमिका द्यावी. परंतु त्याने सपशेल माझ्याकडे दुर्लक्ष केले. काम मिळावे म्हणून मी कपिलला अनेक मेसेज केले, परंतु त्याने माझ्या मेसेजचे उत्तरही दिले नाही. बॉबीने पुढे सांगितले की, सुरुवातीला माझ्या नावावर विनोद करून लोकांकडून स्वतःची वाहवा मिळवली. पण आता तो मला मदत करायला तयार नाही. मी पैशांसाठी नाही, कामासाठी भीक मागत आहे.



# सोनाक्षीसह आता दिव्या तेलुगू सिनेमात

**दाक्षिणात्य** चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेता सुधीर बाबू लवकरच एक सुपरनॅचुरल चित्रपट जटाधारा घेऊन प्रेक्षकांसमोर येत आहेत. वेंकट कल्याण आणि अभिषेक जायसवाल यांच्या दिग्दर्शनात बनत असलेल्या या सिनेमामध्ये सुधीर बाबूसह अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा प्रमुख भूमिका करत आहे, आणि हा तिचा पहिलाच तेलुगू चित्रपट आहे. आता या चित्रपटामध्ये अभिनेत्री दिव्या खोसलाची देखील एन्ट्री झाली आहे, आणि ती या पौराणिक सिनेमामध्ये सितारा नावाची व्यक्तिरेखा साकार करत आहे. चित्रपटातील तिचा फर्स्ट लूक नुकताच शेअर करण्यात आला आहे. हिरव्या रंगाची साडी आणि ऑफ-व्हाइट रंगाच्या ब्लाउजमध्ये दिव्या खूप सुंदर दिसत आहे. हा सिनेमा तेलुगूसह अनेक भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.




# प्रियदर्शन निवृत्त होणार?

**दिग्दर्शक** प्रियदर्शन यांचे नाव चित्रपटसृष्टीतील यशस्वी व ज्येष्ठ दिग्दर्शकांच्या यादीत येते. कॉमेडी चित्रपटांमध्ये त्यांनी आपला ठसा उमठवला आहे. हेरा फेरी, भूल भुलैया, हंगामा आणि हलचल सारखे क्लासिक कॉमेडी चित्रपट त्यांनी आतापर्यंत बनवले आहेत. अनेक वर्षांनंतर प्रियदर्शन पुन्हा एकदा प्रेक्षकांना हसवण्यासाठी लोकांसमोर येत आहेत. आतापर्यंत त्यांनी हिंदीमध्ये अधिकतर चित्रपट अभिनेता अक्षय कुमार याच्यासमवेत केले आहेत आणि आगामी तीन चित्रपटही ते अक्षय कुमारला घेऊनच बनवत आहेत. त्यातील भूत बंगला हा सिनेमा पूर्ण झाला आहे. नुकतेच प्रियदर्शन यांनी एक वक्तव्य केले आहे, ज्यामुळे त्यांचे चाहते नक्कीच उदास होतील. प्रियदर्शन यांनी आतापर्यंत कधी आपल्या चित्रपटांचे सिक्वेल बनवलेले नाहीत आणि त्यांना ते आवडत देखील नाही. परंतु हेराफेरी ३ करण्यासाठी ते तयार झाले आहेत. एका डिजिटल मासिकाशी बोलताना प्रियदर्शन यांनी सांगितले की, मी कधी ओरिजनल चित्रपटांचे सिक्वेल बनवत नाही. ही माझी काम करण्याची पद्धत नाही. परंतु मी हेराफेरी ३ नक्की बनवणार आहे कारण निर्माता अनेक काळापासून मला विनंती करत होता. प्रियदर्शन यांनी पुढे सांगितले की, मी अक्षय कुमारसह हेरा फेरी ३ आणि हैवान या दोन चित्रपटांचे शूटिंग पूर्ण केल्यानंतर मी निवत्त होण्याचा विचार करत आहे कारण मी आता थकलो आहे.




# ४० वर्षांचा मुलगा आणि ३३ वर्षांची आई?

**गेम** चेंजर या सिनेमानंतर अभिनेता राम चरण आपला आगामी चित्रपट आरसी १६ म्हणजे पेड्डी या सिनेमाच्या तयारीमध्ये व्यस्त आहे. या सिनेमामध्ये तो बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूरसोबत प्रमुख भूमिका करत आहे. या चित्रपटामध्ये राम चरणच्या आईच्या भूमिकेसाठी एका अभिनेत्रीला विचारण्यात आले तेव्हा तिने सरळ नकार दिला. कोण आहे ती अभिनेत्री ? का नकार दिला? ही अभिनेत्री आहे स्वासिका. आत्तापर्यंत तिने वसंती, कुमी आणि आराट्टु सारख्या मल्याळम चित्रपटांमध्ये आपले अभिनय कौशल्य सिद्ध केले आहे. स्वासिकाने आतापर्यंत अनेक चित्रपटांमध्ये आईच्या भूमिका केल्या आहेत. तिला काही काळापासून तशाच भूमिकांसाठी विचारले जात आहे. परंतु राम चरणच्या पेड्डी मध्ये तिला आईची भूमिका करण्यासाठी विचारले गेले तेव्हा तिने ही भूमिका करण्यास नकार दिला. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये स्वासिकाने नकार देण्याचे कारण सांगितले आहे. स्वासिका म्हणाली की, मला एका पाठोपाठ एक आईच्या भूमिका मिळत आहेत. मला सर्वात नवल वाटलं ते या गोष्टीचे की, मला राम चरणच्या आईच्या भूमिकेसाठी विचारले. मला माहित नाही की, ही भूमिका मी केली असती तर काय झाले असते. परंतु यावेळी मला राम चरणच्या आईची भूमिका करण्याची आवश्यकता वाटत नाही. म्हणून मी ही भूमिका करण्यास नकार दिला. भविष्यात अशी ऑफर मिळाली तर मी विचार करेन. माझे वय आता अवघे ३३ वर्ष आहे आणि राम चरण ४० वर्षांचा आहे. वयामधील सात वर्षांच्या फरकामुळे मी हा सिनेमा नाकारला.



# नवाकाळ शब्दकोडे-१३५४



**आडवे शब्द –**

१. गर्दी टाळून एकांतात रमणारा ५. बातमी ७. किरकोळ, नगण्य व्यक्ती १०. नगर ११. गोधडी १२. वटवट १४. जोराचे भांडण १६. कवाड १७. पीठ चाळल्यावर उरणारा घटक १८. लोचट २०. सध्या वादाच्या भोवऱ्यात ठरलेला पक्षी २१. रेती २२. चिकार, पुष्कळ २४. चिखल २५. वरणफळे २७. मेंदू २८. अंधाराचा शत्रू, सूर्य २९. किल्ल्याच्या तटाखालचा उतार ३०. शिक्षक ३२. तलावातील हाउसबोट ३३. ओढा ३४. हिस्सा ३६. शिक्षण ३८. अंगरखा ३९. वर्ष, संवत्सर ४०. पार्वती ४१. कीर्तन ४३. बस्तान ४५. जाणीव, कल्पना ४६. सिद्ध ४७. धनुष्य ४९. खुलासा ५२. युद्धातले यश, मुलांचे एक नाव ५३. विचार, हेतू, बेत ५४. निर्जन ५५. श्रम ५६. बांगड्या घेण्यासाठी मनगटाचे माप ५७. कुचकामी, निरर्थक ५८. आच, उष्णता ५९. दुधी भोपळ्याहून लांबलचक फळभाजी ६०. सिंहासन ६१. घोटाळा ६२. तक्तपोशी ६४. पोपटाचे आवडते फळ ६६. व्याख्याता ६७. खुंटी ६८. पोशाख ६९. साद ७०. गाडा ७१. खोटा आरोप ७४. अर्धचंद्र ७५. शासकीय ७६. कंटाळा, वीट ७७. नुकतेच जन्मलेले ७८. स्तुती ८१. पतंगाचा दोरा ८२. डाव्या हाताने कामे करणारा ८५. स्तोत्र ८७. उजळणी, प्रॅक्टिस ८९. अरुंद रस्ता ९०. गाढव ९१. जलप्रवासाचे कामचलाऊ साधन ९२. विशाल ९३. कुमक ९५. नोकर ९७. कंठ, गळा ९८. केळीचे झाड १००. चंद्र १०१. पत्नी १०३. उसाचा रस आटवण्यासाठी कढई १०४. नवरात्रातील पंचमी १०५. मौजेचे, आनंददायी

**उभे शब्द –**

१. एकूण २. गोष्ट, कहाणी ३. कुक्कुट ४. टपाल ५. घरी शिवलेले उबदार पांघरूण ६. अडथळा ७. पुरुषांचे दाक्षिणात्य अधरीय ८. विटेवर उभ्या विठ्ठलाचे एक वर्णन ९. थंडी १०. बोभाटा १३. बगळ्यांची माळ १४. खोडकर १५. कोल्हा १७. घुसमट १९. वारू २३. होऊन गेलेला काळ २६. झाडाच्या बुंध्यात केलेले घरटे २७. भित्रा, घाबरणारा ३०. नीच व्यक्ती ३१. शिफारस ३२. किळस ३३. स्त्री ३४. नियमित येणेजाणे, राबता ३५. तळपायाचा मांसल भाग ३७. अतिशय जड ४०. कमी महत्त्वाचे ४१. प्रयत्न ४२. अप्रिय झालेला ४४. काठी ४५. बासुंदी, कॉफी वगैरेला सुगंध आणणारा पदार्थ ४६. गवताची काडी ४८. शासन, शिक्षा ४९. सडेतोड बोलणारा ५०. काव्य करणारा ५१. कसेतरी अडखळत चाललेले काम ५२. विजयाच्या घोषणा ५४. आवली, रांग ५५. अप्रिय, कटू ५८. लगेच ६२. साक्षात मृत्यू, काळ ६३. बंधन ६५. ऐट ६८. आवरण ६९. पराभव ७२. बनारसी आंबा ७३. पती, यजमान ७५. जिवंत प्राणी ७६. उघड, उजेडात आलेले ७७. नखाच्या तळाशी आलेली सूज ७९. निवास, राहणे ८०. निराळा, हटके ८३. शेतकीचे एक हत्यार, कुळव, जमीन सपाट करण्याचे साधन ८४. पाणी देण्यासाठी रोपांभोवती केलेले आळे, खाचर ८६. सोंगटी ८७. सभा ८८. वेखंड ९१. अंधार दूर करणारा, सूर्य ९२. प्राणायामातील शुद्धीक्रियेचा प्रकार ९४. खेळकर सोपे, मुलांचे एक नाव ९६. जाड आवरण, चिलखत ९७. भाग्य ९८. उपजत आवड ९९. सरण १०१. नेहमी १०२. गर्दी, दाटी

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १३५३चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. उपजत ७. मुख ९. उसासा ११. साग्रसंगीत १२. बलिप्रतिपदा १४. जीर्णोद्धार १५. चकमक १७. दलदल २०. सामना २२. रव २३. महत्त्व २४. मूल २६. अंक २७. राघू २८. सदोदित २९. कंठ ३०. शेजारधर्म ३१. समय ३३. बार ३४. खप ३५. चिंतन ३६. कण ३९. बाह्यात ४०. नवरत्ने ४२. नर ४३. सारी ४४. शरणागत ४७. नीला ४९. शाकुंतल ५०. रवंथ ५१. हयगय ५२. तग ५४. रजत ५६. वेळू ५७. आवर ५८. कलेवर ६१. अटळ ६२. वाया ६४. पडसे ६५. सावित्री ६६. खंदक ६७. करवत ६९. टेप ७०. अगम्य ७१. यक्ष ७२. पटकन ७४. भरकटणे ७६. वश ७७. भद्रकाली ७९. भगर ८१. मका ८२. धनवंत ८४. दिनकर ८७. स्मरणी ८८. कुवत ९०. तड ९१. डेग ९२. साज ९३. शेव ९४. सायास ९७. कसकस ९९. डगला १०१. तरतरी १०२. मदार १०३. रौरव

**उभे शब्द** : १. अग्रक्रम २. उगीच ३. पतकर ४. तबक ५. अप्रतिहत ६. श्वापद ८. खजील ९. उद्धार १०. सार १३. दालमूठ १६. मवसर १८. दल १९. कुकर्म २०. साहस २१. नारायण २३. मदिरा २५. गजानन २६. अंधकार २९. कंपवात ३०. शेत ३२. मकरकुंडले ३३. बाजरी ३५. चिंतनीय ३७. नाशवंत ३८. राणा ४१. वट ४२. नशा ४३. साल ४५. रथ ४६. गर्व ४८. लागण ५०. रजनी ५१. हळूवार ५२. तवसे ५३. गर ५५. कटक ५७. आडवाट ५८. कराटे ५९. वसा ५०. रविवार ६१. अदम्य ६३. यावच्चंद्रदिवाकरौ ६६. खंगणे ६७. कक्ष ६८. म्यान ७०. अटकाव ७१. यशवंत ७२. पलीकडे ७३. कद्रू ७४. भरणी ७५. कमकुवत ७६. वन ७८. कान ७९. भस्मसात ८०. गरज ८३. तडक ८५. रगड ८६. मसाला ८९. तसा ९३. शेर ९५. याम ९६. सदा ९८. सर १००. गट्टी



घाटकोपर (पूर्व) विधानसभा अंतर्गत येणाऱ्या पंतनगर शाखेच्या वतीने श्री गणेशोत्सवात घराघरात पूजा साहित्य वाटप करण्यासाठी विधानसभा समन्वयक प्रसाद कामतेकर व शाखाप्रमुख विशाल चावक यांनी तयार केले आहे. याचे उद्घाटन ईशान्य मुंबई विभागप्रमुख सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

## सिंहगडावर बेपत्ता तरुण पाच दिवसांनी सापडला

■ पुणे

**पुण्यातील** सिंहगड किल्ल्यावरून पाच दिवसांपूर्वी बेपत्ता झालेला गौतम गायकवाड (२४) संध्याकाळच्या सुमारास सापडला. त्याची तब्येत स्थिर असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.या प्रकरणात गूढ कायम असल्याने पोलीस सीसीटीव्ही फुटेजचा तपास करत आहेत.

गौतम गायकवाड २० ऑगस्ट रोजी चार मित्रांसह सिंहगड किल्ल्यावर फिरण्यासाठी गेला होता. तानाजी कड्याजवळ लघुशंकेसाठी थांबतो, असे सांगून तो बाजूला गेला. मात्र त्यानंतर तो परतलाच नाही. मित्रांनी तत्काळ पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस व बचावपथकाने शोधमोहिम सुरू केली होती. गौतमचे मित्र तो दरीत पडल्याचा संशय व्यक्त करत होते. त्यानुसार शोधमोहिम कड्याच्या परिसरात सुरू होती. मात्र या तपासात सिंहगड किल्ल्याच्या पायथ्यावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक तरुण पळत व लपत असल्याचे दिसले. या फुटेजवरून पोलीस अधिकाऱ्यांना हा प्रकार मुद्दाम घडवल्याचा संशय आला. शोध घेतल्यानंतर तो सापडला. गौतमने स्वतः गायब होण्यामागचे कारण स्पष्ट केलेले नाही. परंतु त्याच्यावर २० लाख रुपयांचे कर्ज असल्यामुळे वसुलीसाठी त्याला धमकीचे फोन येत होते. त्यामुळे त्याने बेपत्ता होण्याचा बनाव रचल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## मंत्री शिरसाट यांच्याविरोधात पुरावे! रोहित पवारांनी राजीनामा मागितला

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर बिवलकर कुटुंबाला नियमबाह्य पद्धतीने जमीन दिल्याचा गंभीर आरोप केला. याप्रकरणी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांच्या विरोधात १२ हजार पानांचे पुरावे सादर केले.यामध्ये बिवलकर कुटुंबाचा १९९३ चा अर्ज, सिडकोने फेटाळलेले चार पूर्वीचे अर्ज, विधी व न्याय विभागाचा अहवाल, नगरविकास विभागाचे १ मार्च २०२४ चे पत्र, सिडकोचा ठराव आणि सिडकोचे सर्वोच्च न्यायालयात सादर केलेले शपथपत्र या कागदपत्रांचा समावेश होता. आ. पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणाची दखल घेऊन मंत्री शिरसाट यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

आमदार रोहित पवार म्हणाले की,सिडकोने विधी व न्याय विभागाच्या अहवालाला नकार दिला. तरीही संबंधित जमीन बिवलकर कुटुंबाला दिली.मुख्यमंत्री फडणवीस यांनी याप्रकरणी पुरावे मागितले होते.

## मरिन ड्राईव्हजवळ समुद्रात तरुणीचा मृतदेह आढळला

■ मुंबई

**मरिन** ड्राईव्ह परिसरातील नरिमन पॉईंट येथील समुद्रात मनिता गुप्ता (२४) या तरुणीचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली. ती कालपासून बेपत्ता होती. या प्रकरणी कफ परेड पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनिताच्या चेहऱ्यावर जखमेच्या खुणा आढळल्या आहेत.

ही हत्या आहे की आत्महत्या याबाबत अद्याप स्पष्टता नाही.तिच्या शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. तर कफ परेड पोलीस याप्रकरणाचा मृत तरुणीचा मोबाईल आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत आहेत.

## कोल्हापुरात बेपत्ता शेतकऱ्याचा मृतदेह बंधाऱ्यावर सापडला

■ कोल्हापूर

**कोल्हापुरातील** गुडाळ येथून १० ऑगस्ट रोजी बेपत्ता झालेल्या शेतकऱ्याचा आज शिरगाव बंधाऱ्यावर मृतदेह आढळला. कृष्णात नाना माळवी (६४) असे या मृत शेतकऱ्याचे नाव आहे. सकाळी १० च्या सुमारास शिरगाव येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यात अडकलेल्या लाकडांमध्ये माळवी यांचा मृतदेह आढळला. हा मृतदेह सडलेल्या अवस्थेत होता.

जवळच असलेल्या आमजाई व्हरवडे येथील स्मशानभूमीत तेथील ग्रामस्थ एका मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी आले होते. यावेळी काही ग्रामस्थांनी हा मृतदेह माळवी यांचा असल्याचे ओळखले. त्यानंतर याबाबत पोलिसांना कळवण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून माळवी यांच्या कुटुंबियांना बोलावले.

यावेळी त्यांची बहीण आणि पत्नीने हा मृतदेह माळवी यांचाच असल्याचे सांगितले. दरम्यान, उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांकडे अंत्यसंस्कारासाठी देण्यात आला. माळवी यांच्या पश्चात पत्नी, बहीण, मुलगा, मुलगी, जावई -नात असा परिवार आहे.

## विश्रांतीनंतर राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार

■ मुंबई

**राज्यात** मागील आठवड्यात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली होती. शेती पिकांचे कोट्यवधींचे नुकसान झाले. मागील दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर आता राज्यात पावसाचा जोर पुन्हा वाढला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात आणि मध्य प्रदेशात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात आगामी दोन दिवसांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. यामुळे राज्यातील काही भागांमध्ये ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी केला आहे.यामध्ये रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, नंदुरबार, जळगाव, धुळे, नाशिक, परभणी, लातूर, नांदेड, हिंगोली भागात ऑरेंज अलर्ट आणि उर्वरित राज्यात यलो अलर्ट जारी केला आहे.

आज आठवड्याच्या पहिल्या दिवशी सकाळीच मुंबईत जोरदार पावसाने हजेरी लावून मुंबईकरांची तारांबळ उडवली. सायनमधील गांधी मार्केट परिसर आणि ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे येथे पाणी साचले होते.विलेपार्ले विमानतळाजवळील वाहतूक बाधित झाली होती.यासंदर्भात विमान कंपन्यांनी प्रवाशांना आवश्यक सूचना दिल्या होत्या. दरम्यान मध्य, पश्चिम आणि हार्बर रेल्वे सेवा सुरळीत सुरु होती.

दरम्यान सातपुडा परिसरात मुसळधार पावसामुळे निसारा नदीला पूर आल्याने पुलावर बोलेरो कार पुरात अडकली. या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी प्रयत्न करून पुरात अडकलेले वाहन बाहेर काढले. तर स्थानिक प्रशासनाने खबरदारीचा इशारा देऊन नागरिकांनी नदी,ओढे,पूल ओलांडताना सावधगिरी बाळगण्याची सूचना दिली आहे. या पर्वतरांगांमध्ये झालेल्या पावसामुळे वान धरण ८३.६५ टक्के भरले.सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्याचे दोन दरवाजे उघडून ७३.८६ क्युसेस पाण्याचा विसर्ग केला.


**लोणावळा नगरपरिषद, लोणावळा**

स्थापना: १८७७

ता. मावळ, जि. पुणे ४१० ४०१

दूरध्वनी क्र.02114-275464, 275463 टोल फ्री क्र.18002335463

E-mail: lmc1877@gmail.com

Website: www.lmc.org.in, www.lonavalamahaulb.maharashtra.gov.in

जा.क्र. लोनप 12/POP BAN/२०२५-२६/२२८७ दि. २५/०८/२०२५

*** जाहीर आवाहन ***

लोणावळा शहरातील समस्त कुंभार समाज बांधव, मूर्तिकार, मूर्ती विक्रेते आणि नागरिकांना सूचित करणेत येते की, पर्यावरणपूरक गणेश उत्सव साजरा करणे कामी प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासून बनविलेल्या मूर्तीच्या बंदी बाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांनी दिनांक १२/०५/२०२० रोजी पारित केलेले मार्गदर्शन तत्वानुसार कोणत्याही विषारी अजैविक कच्चा माल (जसे की, पारंपारिक चिकणमाती आणि माती तसेच प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासून प्लास्टिक आणि थर्माकॉल (पॉलोस्टेरीन) विरहीत नैसर्गिक जे विघटनशील पर्यावरणास अनुकूल असलेल्या कच्च्या मालापासून बनवलेल्या मूर्तीस प्रोत्साहन अनुमती देण्यात यावी व प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) च्या मूर्तीवर बंदी घालण्यात यावी असे सूचित करणेत आले आहे.

तसेच सदरची मार्गदर्शक तत्वे धार्मिक उत्सव साजरे करताना नैसर्गिक जलस्त्रोतांच्या गुणवत्तेवर व पर्यावरणावर कोणताही परिणाम न होता पर्यावरणपूरक मूर्तीचे विसर्जन सुनिश्चित करण्यासाठी तयार करणेत यावे. तरी लोणावळा शहरातील समस्त कुंभार समाज बांधव, मूर्तिकार, मूर्ती विक्रेते आणि नागरिक यांना सूचित करणेत येते की, माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे कामी प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासून बनविलेल्या मूर्तीवर बंदी घालणे बाबत सूचित करणेत आले आहे. तसेच पर्यावरणास अनुकूल असलेल्या कच्च्या मालापासून बनवणेत आलेल्या मूर्तीना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ दिल्ली यांनी पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या अन्वये परवानगी देणेत आलेली आहे याची दक्षता घ्यावी.

सही /-
( अशोक साबळे )
मुख्याधिकारी
लोणावळा नगरपरिषद



**लोणावळा नगरपरिषद, लोणावळा**

स्थापना: १८७७

ता. मावळ, जि. पुणे ४१० ४०१

**विद्युत विभाग**

**जाहिर ई-कोटेशन सूचना**

जा.क्र लोनप १०/निविदा/ जा. प्रसिद्धी/२०२५-२६/२२५३ दि. २२/०८/२०२५

**लोणावळा नगरपरिषदेच्या मार्फत खालील नमूद कामांकरिता ठेकेदारांकडून जाहीर ई-कोटेशन मागविण्यात येत आहेत.**

**कामाचे नाव -**

**१. लोणावळा नगर परिषद हद्दीतील सर्वे नं. २३४ येथील आरक्षण क्र. ७२ येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे अस्थेटीक फसाड लायटिंग करणे व अनुषंगिक क- ामे करणे.**

**२. लोणावळा नगर परिषद हद्दीतील खंडाळा तलाव येथे अस्थेटीक फसाड लायटिंग करणे व अनुषंगिक कामे करणे.**

या कामांची ई-कोटेशन अर्ज प्रक्रियेचा संपूर्ण तपशिल निविदा संकेत स्थळ http://mahatenders.gov.in या वर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. निविदेबाबत काही अडचण अथवा शंका उद्भवल्यास नगर परिषदेच्या विद्युत विभागाशी संपर्क करावा.

सही /-
मुख्याधिकारी
लोणावळा नगरपरिषद



**PUBLIC NOTICE**

Take Notice that, one Mihir Virendra Gosalia alongwith his grandmother Late Dhirajben Amrutlal Gosalia, were jointly entitled to Flat No. C-4, situated on the Ground Floor of Sagar Vaibhav CHSL, Laxman Mhatre Road, Dahisar west, Mumbai- 400068 ("**Old Flat**") and membership of the said Sagar Vaibhav Co-operative Housing Society Limited ("**Society**") as evidenced vide Share Certificate No. 82 bearing distinctive numbers from 406 to 410 shares, issued in their favour ("**Shares**"), each having 50% undivided share, right title and interest in the said Flat and the Shares.

Mihir Virendra Gosalia has furnished to the Society a Deed of Release dated 5th May, 2025 which is registered with the Office of Joint Sub Registrar of Assurances at Mumbai, under Serial No. MBE 18-9019 of 2025 , whereunder 1. Nalini Virendra Gosalia 2. Hiral Bhavesh Shah 3) Kajal Virendra Gosalia , by virtue of being the only surviving legal heirs of Late Dhirajben Amrutlal Gosalia, have voluntarily released and conveyed their respective undivided share, right, title and interest in the Old Flat and Shares of the Society, in favour, Mihir Virendra Gosalia, making him solely entitled to the Old Flat and Shares of the Society.

The Old Building in which the said Old Flat was situated has since been demolished and redeveloped and a New Flat is constructed in lieu of the said Old Flat C-4 in the redeveloped building ("**New Flat**"). However, the Permanent Alternate Accommodation Agreement in respect of the New Flat is still pending execution and registration.

In view of the aforesaid, Mihir Virendra Gosalia has applied to the Society and has requested for execution and registration of the said Permanent Alternate Accommodation Agreement in respect of the New Flat solely in his name.

The Society hereby invites claims, representation or objections from any heir or heirs or other claimants/ objector or objectors, to the execution and registration of the permanent alternative accommodation in respect of the said New Flat and issuance of membership rights in the said Shares of the Society solely in favour of Mihir Virendra Gosalia OR having any interest of the Late Dhirajben Amrutlal Gosalia in the capital/ property of the Society OR by way of any sale, mortgage, lease, charge, exchange, gift, lease, sub-lease, lien, preemption, assignment, heirship, tenancy, memorandum of understanding, inheritance or otherwise whatsoever, should notify the same in writing to the Society with supporting documents, substantiating such objections/ claims/interest/details, if any, within a period of **14 (fourteen) days** from the publication of this notice. If no claims/ objections are received within the period prescribed above, the Society shall be free to execute and register the permanent alternative accommodation in respect of the said New Flat and issue sole membership rights of the Society in favour of Mihir Virendra Gosalia in such manner as in provided under the bye-laws of the society . A copy of the registered bye-laws of the Society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the Society/with the secretary of the society between 9 Am to 6 PM from the date of publication of this notice till the date of expiry of its period.

Date : 26.08.2025
Place : Mumbai

For and on behalf of
Sagar Vaibhav CHSL
sd/-
Chairman/Secretary



**जाहीर नोटीस**

१) श्रीम रुक्साना नसीरुद्दीन खान रा. सायन टॉबे रोड मानखुर्द मुंबई ८८. ... **अर्जदार**

**विरुध्द**

२) महानगरपालिका कल्याण डोंबिवली निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, ता. कल्याण जि.ठाणे ... **सामनेवाला**

**तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:**

२) उपरोक्त अर्जदार श्रीम रुक्साना नसीरुद्दीन खान यांचा जन्म दिनांक १४/०२/१९६८ रोजी त्यांचे अगोदर राहत असलेल्या घरी शिवाजी नगर, एक केबिन, शंताबाई वालधुनी कल्याण, ता. कल्याण, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म ची नोंद जन्म नोंदणी विभाग, महानगरपालिका कल्याण डोंबिवली निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, कल्याण दफ्तरी करुन जन्म चा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

३. उशीरा जन्म ची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि. ०४/०८/२०२५ दाखल केला आहे.

४. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे श्रीम रुक्साना नसीरुद्दीन खान जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे /०८/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

(सचिन शेजाळ)
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी कल्याण



**जाहीर सूचना**

सर्व नागरिकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, ऑफिस क्र. २, तळ मजला, उत्कर्ष को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं. १०३५, बोताडकरवाडी, जे. ए. राऊळ मार्ग, प्रभादेवी,मुंबई - ४०० ०२५ या मिळकतीचे क्षेत्रफळ-४२५ चौ. फूट. बिल्ट-अप असून, सदर मिळकत हि मंदिरा दत्ता यांच्या मालकीची आहे. सदर मिळकत हि मंदिरा दत्ता यांनी श्री. उदयवर रापवेंद्र आचार्य (विक्रेता) व श्री. अजित बालकृष्णन आणि मंदिरा दत्ता (खरेदीदार) तसेच डी. एच. लोटलीकर (बिल्डर) यांमध्ये दि. २१/०२/१९८६ रोजी निष्पादित करारनामा या दस्तान्वये विकत घेतली असून, सद्यस्थितीत सदर करारनामा दि. २१/०२/१९८६ हा दस्त मंदिरा दत्ता यांकडे उपलब्ध नाही.

सदरची मिळकत म्हणजेच ऑफिस क्र.२ हे श्री.नरेश जयंतीलाल दोशी यांना मंदिरा दत्ता यांकडून विकत घ्यावयाचे आहे. सदरची मिळकत हि मंदिरा दत्ता यांनी श्री.नरेश जयंतीलाल दोशी यांना विकण्याचे काबुल केले आहे. तरीही सदर मिळकतीचे विक्रीबाबत कोणतीही व्यक्ती, संस्था, कंपनी यांचे अधिकार, कुटुंबातील व्यक्ती, गहाण, दान, बोजा, तारण, साठेकरार, खरेदीखत, मुख्त्यारपत्र, वारसा, बक्षीसपत्र, या अगर इतर स्वरूपात हक्क आणि अधिकार असतील तर त्यांनी आपल्या लेखी हरकती खालील पत्त्यावर योग्य त्या कागदपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत नोंदवाव्यात, दिलेल्या मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदर विक्रीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे गृहीत धरले जाईल. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. लेखी हरकतीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा.

दि.२६/०८/२०२५

ॲड. दिपीका ए. साखळकर
४२-बी,१०वा मजला, सी. एच. एस. एल.,
जे. ए. राऊळ मार्ग, प्रभादेवी,
मुंबई - ४०० ०२५

## भारत रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवणार



**मॉस्को-** अमेरिकेचा दबाव झुगारत रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवणार असल्याचे भारताने स्पष्ट केले. रशियातील भारतीय राजदूत विनय कुमार यांनी सांगितले की, योग्य आणि माफक दरात जिथून तेल मिळेल, तिथून भारतीय तेल कंपन्या तेल खरेदी करतील. भारतातले रशियाचे राजदूत रोमन बाबुश्किन यांनी रशियाकडून खरेदी केल्या जाणाऱ्या तेलावर भारताला जवळपास ५ टक्के सवलत दिली जात असल्याचे सांगितले. चीननंतर भारत हा रशियाचा सर्वांत मोठा तेल खरेदीदार देश आहे. युक्रेन युद्धापूर्वी भारत रशियाकडून दररोज केवळ ०.२ टक्के (६८ हजार बॅरल) तेल आयात करत होता. मे २०२३ मध्ये ही खरेदी तब्बल ४५ टक्क्यांनी वाढली. जानेवारी ते जुलै २०२५ पर्यंत भारत रशियाकडून दररोज १७.८ लाख बॅरल तेल खरेदी करत आहे. रशियाकडून भारताला तेल खरेदी करण्याची गरज नाही. केवळ नफेखोरीसाठीही खरेदी केली जात असल्याचा आरोप अमेरिकेकडून केला जात आहे.



आंबेवाडीचा राजा





ढोल-ताशाच्या गजरात गणेशोत्सव मंडळांनी लाडक्या बाप्पाची मुर्ती मंडपास्थळी नेली.



महालक्ष्मीचा विघ्नहर्ता (सर्व फोटो- दीपक साळवी)



गंगावाडीचा गणराज



जोगेश्वरीचा राजा, प्रेमनगर

## मुंबईचा राजाचा ९८ वा गणेशोत्सव सोहळा

■ मुंबई

**स्मरणिका प्रकाशन सोहळ्यासह विविध कार्यक्रम**

**लालबाग** सार्वजनिक उत्सव मंडळ, गणेशगल्ली यांच्या वतीने आयोजित मुंबईचा राजाचा ९८ वा गणेशोत्सव सोहळा २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवाच्या प्रारंभी मुंबईचा राजाची प्राणप्रतिष्ठापना व पूजन बुधवार २७ ऑगस्ट रोजी सकाळी ६.०० वाजता संपन्न होईल. त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत स्मरणिका प्रकाशन सोहळा होणार आहे. शुक्रवार, २९ ऑगस्ट रोजी श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली असून सायंकाळी ५.०० ते रात्री १०.३० या वेळेत भक्तांनी तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष किरण प्रभाकर तावडे, सरचिटणीस स्वप्निल सुरेश परब आणि खजिनदार निखिल शंकर नानचे यांनी केले आहे.

## निक्की भाटीचा जळून मृत्यू पैसे, रील की पार्लरमुळे?

■ नवी दिल्ली

**दिल्लीजवळच्या** ग्रेटर नोएडा येथील सिरसा गावात झालेल्या निक्की भाटी मृत्यू प्रकरणी पोलिसांना दररोज नवे नवे खुलासे समोर येत आहेत. निक्कीने कुटुंबाला मदत करण्यासाठी काढलेल्या पार्लरला पतीचा विरोध होता. त्याचबरोबर ती तिच्या बहिणीसह जे रील बनवत होती त्यावरही पतीला आक्षेप होता. त्यातच त्याच्या घरच्यांनी पैशांची मागणी केली होती. यामुळे तिला पैशांसाठी जाळले की, ती रील बनवत होती म्हणून जाळले की, ती पार्लर चालवत होती म्हणून जाळले याचा तपास पोलीस करीत आहे.

निक्कीला याआधीही मारहाण झाल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमावर व्हायरल झाल्याने या परिसरात नाराजी व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणी निक्कीचा पती, दीर व सासुसासऱ्यांना अटक केली आहे. निक्की भाटीयाला २१ ऑगस्ट रोजी तिच्या अंगावर थिनर टाकून जाळण्यात आले. तिच्या बहिणीने तिला आधी जवळच्या रुग्णालयात नेले असता ती अधिक प्रमाणात होरपळल्यामुळे तिला दिल्लीच्या सफरजंग रुग्णालयात नेण्यास सांगितले. तिथे जात असताना वाटेतच तिचा मृत्यू झाला.

## आमदाराची भिंतीवरून उडी ईडीने पाठलाग करत पकडले

**शिक्षक घोटाळा प्रकरणी कारवाई**

■ कोलकाता

शिक्षक घोटाळा प्रकरणात ईडीच्या पथकाने तृणमूल काँग्रेसचे आमदार जीवन कृष्णा साहा यांच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील घरावर छापा टाकला. यावेळी आमदार साहा यांनी भिंतीवरून उडी मारून पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण ईडीच्या पथकाने पाठलाग करून त्यांना पकडले.

ईडी अधिकाऱ्यांच्या मते, साहा पळून जात असताना त्यांना शेतात पकडण्यात आले. छाप्यावेळी आमदाराने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्नही केला. आपला मोबाईल घराशेजारच्या विहिरीत फेकून दिला. तथापि, ईडीच्या पथकाने विहिरीतून दोन्ही मोबाईल ताब्यात घेतले. आता ते न्यायवैद्यक तपासासाठी पाठवण्यात येणार आहेत.

अधिकाऱ्यांनी सांगितले, की बीरभूम जिल्ह्यातील व्यक्तीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर ही छापेमारी करण्यात आली. या व्यक्तीने शिक्षक भरती घोटाळ्यातल्या देवाणघेवाणीबद्दल खळबळजनक दावे केले होते. या व्यक्तीला घेऊनच ईडीचे पथक टीएमसी आमदाराच्या घरी पोहोचले. याप्रकरणी ईडीच्या पथकाने आमदार साहा यांचे मुर्शिदाबाद येथील घरासोबतच सासरवाडी आणि बीरभूम जिल्ह्यात पीएसच्या घरावर छापेमारी केली.

## दिल्लीच्या मुख्यमंत्री गुप्तांची झेड सुरक्षा ४ दिवसांतच मागे

■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या** मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांना देण्यात आलेली झेड सुरक्षा आज तडकाफडकी मागे घेण्यात आली. ४ दिवसांपूर्वीच त्यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर झेड सुरक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र लगेच ही सुरक्षा मागे का घेण्यात आली, याबद्दलची माहिती उघड झालेली नाही.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अखत्यारितील दिल्ली पोलिसांवरच मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेची जबाबदारी असणार आहे. झेड सुरक्षेमध्ये गुप्ता आणि त्यांच्या सरकारी निवासस्थानाच्या सुरक्षेची जबाबदारी अर्धसैनिक दलावर होती. गुप्ता यांच्यावरील हल्ला प्रकरणी काल दुसरी अटक झाली. मुख्य आरोपी राजेशभाई याचा सहकारी तहसीन सय्यद असे अटक करण्यात आलेल्या दुसऱ्या आरोपीचे नाव आहे.

## डीजे नको बँड लावा! नेत्यांनी पैसे दिले नाही तर माझी बॅग आहेच

■ छत्रपती संभाजीनगर

**शिरसाटांची मिश्किल टिप्पणी**

**गणेशोत्सवादरम्यान** राज्य सरकारने डीजे वाजवण्यावर बंदी घातली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये मिश्किल टिप्पणी करीत म्हटले की, तुम्ही बाहेरून बँड मागवा, पैसे कमी पडले तर माझी बॅग उघडीच आहे. शिरसाट हे घरी बसले आहेत आणि त्यांच्या शेजारी नोटा भरलेली उघडी बॅग आहे असा व्हिडिओ संजय राऊत यांनी व्हायरल केल्याने खळबळ माजली होती. याबद्दल किंचितही खेद न वाटता शिरसाट आता खुलेपणाने त्यावर मिश्किल टिप्पणी करू लागले आहेत.

शिरसाट म्हणाले की, अनेकजण वाद झाला पाहिजे, अशा मानसिकतेत आहेत. पण मी सर्व मंडळांच्या अध्यक्षांना विनंती करतो की, डीजेचा वापर करायचा नाही. त्याऐवजी चाळीसगावचा बँड किंवा वैजापूरचा बेंजो मागवा. पैसे कमी पडले तर हे सर्व नेते मंडळींकडे मागा. काही झाले नाही तर मी आहेच. माझी बॅग उघडीच आहे. गणेशोत्सवात आपण सर्वांना चांगला संदेश देऊ, व्हिडिओ वगैरे सोडू द्या, हे सगळे चालत राहते.

## कंटेनरची ट्रॅक्टरला धडक ८ जणांचा मृत्यू! ४३ जखमी

■ लखनौ

**उत्तर** प्रदेशातील बुलंदशहर जिल्ह्यातील अर्निया पोलीस स्थानकाच्या हद्दीत काल रात्री ट्रॅक्टरला कंटेनरने दिलेल्या धडकेत ८ जणांचा मृत्यू झाला असून, या अपघातात ४३ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, गंभीर जखमींना अलिगढ व बुलंदशहर जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

उत्तर प्रदेशातील हे भाविक ट्रॅक्टरमधून राजस्थानातील गोगामेडी येथील जहारबीर येथे दर्शनासाठी जात होते. अर्निया पोलीस ठाण्याच्या हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४ वर हा ट्रॅक्टर रस्त्यावर उभा होता. त्यावेळी काही प्रवासी खाली उतरले होते. त्यावेळी एका कंटेनरने त्याला धडक दिली.

## ५ महिन्यांच्या गर्भवती पत्नीची पतीकडून निर्घृण हत्या

■ हैदराबाद

**कौटुंबिक** वादातून पतीने पाच महिन्यांच्या गर्भवती पत्नीची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना हैदराबादमध्ये उघडकीस आली आहे. महेंद्र रेड्डी (२७) याने पत्नी स्वाती रेड्डी (२१) हिची हत्या करून तिच्या मृतदेहाचे तुकडे केले. हत्येनंतर त्याने शिर, हात-पाय मुसी नदीत फेकून दिले, तर शिरविरहित धड घरातच ठेवले. पोलिसांनी महेंद्रला अटक केली असून, या प्रकरणाने परिसरात खळबळ उडाली आहे.

मलकजगिरी विभागाचे पोलीस उपायुक्त पी. व्ही. पद्मजा म्हणाले की, वादानंतर महेंद्रने पत्नीची हत्या करून हेक्सा ब्लेडने मृतदेहाचे तुकडे केले. त्यानंतर शिर, हात-पाय प्लास्टिकच्या पिशव्यांत भरून मुशी नदीत टाकले. मात्र, धड त्याने घरातच ठेवले होते. नंतर त्याने मृतदेहाचे तुकडे वेगवेगळ्या प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरले आणि ते नदीत फेकण्यासाठी तो तीन वेळा नदीवर गेला. पोलिसांनी घरातून पीडितेचे धड आणि पाय जप्त केले आहेत, तर इतर अवयवांचा शोध सुरू आहे. हत्येनंतर आरोपीने आपल्या बहिणीला फोन करून पत्नी हरवल्याची माहिती दिली.

मात्र, बहिणीला संशय आल्याने तिने एका नातेवाईकाला सांगितले. त्या नातेवाईकाने महेंद्र याला पोलीस ठाण्यात नेले. तिथेही त्याने पत्नी हरवल्याचा बनाव केला. परंतु कसून चौकशी केली असता, त्याने पत्नीची हत्या केल्याची कबुली दिली. त्याच्या कबुलीजबाबाच्या आधारे, हत्या आणि गुन्ह्याचा पुरावा नष्ट केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पती महेंद्रला अटक करण्यात आली आहे.

## करी रोड पुलावर बेस्ट बसचा अपघात

■ मुंबई

**लालबाग-परेल** परिसरातील करी रोड पुलावर बेस्ट बसचा अपघात झाला. आज पहाटेच्या सुमारास बस परेलहून लालबागच्या दिशेने पुलावरून खाली उतरत होती. यावेळी बस पुलावर असलेल्या रस्ता दुभाजकाच्या रेलिंगवर आदळली. यात बसच्या पुढच्या बाजूचा चेंदामेंदा झाला तर रस्ता दुभाजकाचेही नुकसान झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या मार्गावर बराच वेळ वाहतूक कोंडी झाली होती. या घटनेची माहिती मिळताच काळाचौकी पोलीस तसेच वाहतूक पोलीस घटनास्थळी पोहोचले.

ही बस सांताक्रूझ आगार ते प्रबोधनकार ठाकरे उद्यान, शिवडी येथे जात होती. यावेळी लोअर परेल मार्गे करी रोड येथून शिवडीकडे जात असताना सकाळी ६.२० च्या सुमारास चालकाला रेलिंग न दिसल्याने बस रस्ता दुभाजकावरील रेलिंगवर आदळली.

## कुनोतील चित्त्यांसाठी कान्हातून चितळ रवाना

■ भोपाळ

**देशातील** चित्त्यांचे संरक्षित क्षेत्र असलेल्या कुनो राष्ट्रीय उद्यानातील चित्त्यांना भक्ष्य



मिळावे यासाठी कान्हा अभयारण्यातून ३५ चितळ रवाना करण्यात आले आहेत. कान्हा व्याघ्र प्रकल्पामध्ये चितळांची संख्या मोठी आहे. त्यांचा शेजारच्या गावातील शेतकऱ्यांनाही त्रास होत असतो. दुसरीकडे कुनो येथील चित्त्यांना भक्ष्याची कमतरता आहे. त्यांना भक्ष्य मिळावे व कान्हातील चितळांची संख्या संतुलित राहावी यासाठी एका विशेष वाहनातून हे चितळ रवाना करण्यात आले आहेत. गेल्या वर्षभरात कान्हा, नौरादेही व गांधी सागर राष्ट्रीय उद्यानातून कुनो राष्ट्रीय उद्यानात तब्बल ८०० चितळ पाठवण्यात आले आहेत. मध्य प्रदेश वनविभाग येत्या ऑक्टोबरमध्ये शाजापूर येथील चितळ पकडून ते कुनो व गांधीसागर अभयारण्यात पाठवण्याची विशेष मोहीम राबवणार आहेत.

## ५ ते ७ सप्टेंबरदरम्यान जोधपूरमध्ये संघाची बैठक

■ जोधपूर

**राष्ट्रीय** स्वयंसेवक संघ ५ ते ७ सप्टेंबरदरम्यान राजस्थानमधील जोधपूर येथे तीन दिवसीय सर्व भारतीय समन्वय बैठक घेणार आहे. या बैठकीत संघटनात्मक प्रश्नांसह देशाच्या सुरक्षेशी संबंधित मुद्यांवर व आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विचारमंथन होणार असल्याची माहिती आहे. या बैठकीला सरसंघचालक मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्यासह विविध अनुषंगिक संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. कामगार, शेतकरी, आदिवासी, शिक्षण, लघु व सुक्ष्म उद्योग आणि इतर क्षेत्रांतील संघटनांचे वरिष्ठ पदाधिकारी या बैठकीत उपस्थित राहतील.

## सीएसडीएस संचालकांवरील गुन्हे नोंदवण्यास स्थगिती

■ नवी दिल्ली

**राज्यातील** विधानसभा निवडणुकीमध्ये मतदार याद्यात घोळ झाल्याची माहिती देणारे लोकनिती सीएसडीएसचे सहसंचालक संजय कुमार यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. त्यांच्या विरोधातील नोंदवलेल्या दोन गुन्ह्यांना स्थगिती दिली आहे.

राज्यात मतदारयाद्यांमध्ये घोळ झाल्याची माहिती संजय कुमार यांनी दिली होती. त्यांच्या या दाव्यामुळे राहुल गांधी यांच्या मतचोरी विरोधातील आंदोलनाला बळ मिळाल्याची टीका भाजपाकडून करण्यात आली. त्यानंतर आपल्याकडून चूक झाल्याचे म्हणत संजय कुमार यांनी आपले ट्विट डिलीट केले. त्यानंतर त्यांच्यावर नाशिक व नागपूरमध्ये गुन्हे नोंदवण्यात आले. त्याविरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्यावरील गुन्ह्यांना स्थगिती दिली आहे. संजय कुमार यांनी ट्विटवर माफी मागताना म्हटले होते की, त्यांच्या टीमकडून लोकसभा व विधानसभेच्या मतदार याद्यांची माहिती देण्यात चूक झाली आहे. त्यांनी माफी मागितल्यानंतरही भाजपाने त्यांच्या विरोधात तीव्र टीका केली आहे. माफी मागून हा विषय संपणारा नाही असे अनेक भाजपाच्या नेत्यांनी म्हटलेले आहे.


**MISSING**



**प्यारेलाल जयस्वार**

वय ६५, ५' २", रंग सावला, सफ़ेद बाल, सफ़ेद हाफ शर्ट, हाफ पेन्ट.

निवास स्थान : लालजीपाडा, ओमकार चाल, रूम ११, कांदिवली (वेस्ट) दि. १०/०८/२०२५ पासून हरवले आहे.

माहिती मिळल्यावर कृपया संपर्क

Rajesh : 9699072934

Krishna : 8082012180

Complaint lodge with Kandivali Police station vide NC No. AMR No. 128/25 Dated 10/08/2025